ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ विनवी वसिष्ठाप्रत । फाल्गुन चतुर्थीचें व्रत । शुक्ल पक्षांतर्गत जें असत । त्याचें महत्त्व सांगावें ।।१।। वसिष्ठ तेव्हां संक्षेपें सांगत । फाल्गुन वरदा चतुर्थीचा महिमा पुनीत । माळव्यात भारक नाम नगर ख्यात । सर्व शोभायुक्त होतें तें ।।२।। सर्वधर्मज्ञ लोक निवसत त्यांत । हेमांगद राजा राज्य करित । त्यानें जिंकिलें जग समस्त । शस्त्रास्त्रज्ञ तो विचक्षण ।।३।। अन्य राजे त्यास मानिती । प्रधान आज्ञा पाळिती । त्याचे पुत्र तेजयुक्त अती । नृप द्विजदेवअतिथिप्रिय ।।४।। ऐसी कांहीं वर्षें जात । परी नंतर पोटशूळें नृप संत्रस्त । जणूं शस्त्र खुपसिलें उदरांत । ऐसी पीडा त्यास वाटे ।।५।। नाना यत्न शूलनाशार्थ करिती । मंत्र औषधी आणिती । तीर्थाटनें कित्येक सेविती । पूजिती देवदेवता अनेक ।।६।। ब्राह्मण वेदपारंगत । त्याच्यासाठीं देवांस प्रार्थित । परी उदरशूळ वाढला बहुत । संत्रस्त जाहला तो नृपति ।।७।। विषादी पिऊन देहत्याग करावा । पीडेतून आराम लाभावा । ऐसा विचार मनांत तेव्हां । अकस्मात आले पर्वतमुनी ।।८।। ते महायोगी अवचित येत । राजा त्यांसी वंदन करित । जरी उदरपीडेनें दुःखसंतप्त । ब्राह्मणांद्वारा पूजा करी ।।९।। शूलपीडेचें करून नियमन । हेमागंद म्हणे विनम्र मन । धन्य माझे माता पिता जन्म । धन्य कुळ दारा पुत्र ।।१०।। आपुल्या अंघ्रियुगाचें झालें दर्शन । धन्य झालों मी पावन । ऐसें बोलोनिया वचन । धरणीवरी पडला पीडेनें ।।११।। दारुण दुःखें तो आक्रंदत । तें पाहून पर्वत विस्मित । सचिवांसी तो विचारित । काय होतसे नृपासी ।।१२।। कोणत्या उग्रदुःखें हा पीडित । सांगा सारे मजप्रत । तेव्हां ते त्यास सांगत । उदरपीडेची समग्र कथा ।।१३।। त्यांचें निवेदन ऐकून । पर्वतें लाविलें तैं ध्यान । अंतर्ज्ञानें नृपपाप जाणून । समस्तांसी म्हणतसे ।।१४।। राजा तुझ्या राज्यांत । दारुण पाप असे

घडत । त्यायोगें उदरशूळें तूं पीडित । असह्य वेदना भोगतोसी ।।१५।। तुझ्या राज्यांत चतुर्थी व्रत । झाले असे विनष्ट विस्मृत । त्या दोषामुळें प्रजेसहित । दु:भोग हा ओढवला ।।१६।। पर्वताचें वचन ऐकून । राजा म्हणे हात जोडून । कोणतें हें व्रत महान । कोणी केलें पूर्वीं तें? ।।१७।। कोणाचें करिती त्यांत पूजन । तें सर्व सांगा मज लागुन । तेव्हां गणेश्वर व्रत महान । पर्वत सांगे हेमांगदासी ।।१८।। सर्व सिद्धिकर तें व्रत । चार पुरुषार्थांचा लाभ घडवित । चतुर्थी व्रत माहात्म्य समस्त । विस्तारें तैं वर्णन केलें ।।१९।। तें ऐकून राजा विचारित । कैसा हा गणाधीश असत । त्याचें स्वरूप कैसें असत । सांगा सारें योगिराजा ।।२०।। जाणून मीं मनोभावें भजेन । त्या देवदेवासी पूजीन । तेव्हां गणेशाचें चरित्र प्रसन्न । पूर्ववृत्त सांगे तया ।।२१।। पर्वत सांगती मी ऐकलें । निदाघापासून हें चरित्र भलें । तें तुज सांगेन जें झालें । पावन सुखद सर्वांसी ।।२२।। एकदा मीं तप आचरित । नाना यत्नपर अविरत । माझ्या तेजें सर्वही व्याप्त । जाहलें विश्व त्या समयीं ।।२३।। इंद्र झाला प्रक्षुभित । कामदेवा अप्सरांसहित । मज मोहविण्या पाठवित । तपांत विघ्न करण्यासी ।।२४।। परी मज समीप तो येत । तेव्हां माझ्या तेजें संतप्त । दाहभयें पळून जात । सैनिकांसह समस्त ।।२५।। नंतर मी तपोनिष्ठ होत । नृपा अन्तर्निष्ठ मुदित । तपाचा त्याग करित । शमदमादींत परायण ।।२६।। नाना योगभूमींचा संचार करित । तैं माझ्या महद्भाग्यें तेथ येत । निदाघ अवधूत मार्गरत । त्यास पाहून वंदन केलें ।।२७।। विधानपूर्वक पूजा करित । नंतर तयासी म्हणत । धन्य माझी मातापिता जीवित । तुमच्या पादपद्मदर्शनानें ।।२८।। ब्रह्मभूयप्रद आपण महान । सांगावा मज शांतिप्रद पावन । ऐसा योग जेणें होईन । योगिवंद्य मी साधनानें ।।२९।। वसिष्ठ म्हणती दशरथाप्रत । तेव्हां निदाघमुनी

पर्वतास सांगत । माझें पुरातन वृत्त । ऐक आतां मनोभावें ।।३०।। ज्या योगें मी जगीं लाभत । योगींद्र मुख्यत्व अद्भुत । तें सर्व वृत्त तुजप्रत । वर्णन करितों पर्वता ।।३१।। मी योगप्राप्त्यर्थ प्रयत । योगभूमि परायण अत्यंत । ब्रह्मभूयकर महायोग साधित । तेणें रमलों सदानंदीं ।।३२।। स्वानंदकांत संस्थित । तेथ आनंदरूप पाहात । द्वंद्वांनीं तें सर्वत्र व्याप्त । योगरूपी द्वंद्व होतें ।।३३।। तेणें शांति नष्ट होत । म्हणोनि गेलो विष्णुप्रत । त्यास प्रणाम करून विनवित । शांतिप्रद योग सांगावा ।।३४।। जेणें मी शांत होईन । तें ऐकून विष्णु महान । म्हणे बाळा गणेशावाचून । तारक दुसरा कोणी नसे ।।३५।। तोचि योगशांतीचा प्रदाता । त्यास जाणून आमुच्या चित्ता । लाभली शांति तत्त्वतां । आम्हां सर्व योगीजनांसी ।।३६।। मनोवाणीमय तो गकार । मनोवाणीविहीन णकार । त्यांचा स्वामी गणाधीश उदार । त्यास भजावें योग्य विधीनें ।।३७।। तरीच तुज शांति लाभेल । महाभागा चिंता दूर होईल । संशय सारा फिटेल । इतुकें सांगून विष्णु थांबले ।।३८।। महाविष्णूंचें वचन ऐकून । करूनिया त्यांसी नमन । मीं झालों योगाभ्यासांत निमग्न । एकाक्षर मंत्राचा जप केला ।।३९।। त्या मंत्रजपें संतुष्ट होत । दहा वर्षें जेव्हां पूर्ण होत । सहसा गजानन प्रकट होत । ध्यानस्थ मी तेव्हां होतों ।।४०।। मज म्हणाले गजानन । वांच्छित माग मीं पुरवीन । तेव्हां मीं ध्यान सोडून । प्रणाम करूनी पूजिलें तया ।।४१।। त्यासी स्तुति सामवेदोक्त । स्तोत्ररूपें मी गात । ती ऐकून तुष्ट होत । योगशांति दिली मजलागीं ।।४२।। नंतर तो अन्तर्धान पावत । तेव्हांपासून मी प्रख्यात । गाणपत्य गणेशभक्त । तूही त्यास भज पर्वता ।।४३।। तो गणराजा शांतिदाता । ऐसें सांगून निदाघें मज विनीता । एकाक्षरमंत्र देऊन आर्ता । विधिपूर्वक दीक्षा दिली ।।४४।।

नंतर ते होत अंतर्हित । मी विधिपूर्वक गणपा पूजित । तप करितां भक्तिभावयुक्त । दाखविलें योगमय रूप त्यानें ।।४५।। मी त्याची स्तुति करित । भक्तिभावें तया पूजित । भक्तिभाव दृढ करून मच्चित्तांत । स्वानंदलोकीं तो परतला ।।४६।। ऐसें पूर्ववृत्त सांगून । हेमांगद नृपासी मंत्र देत पावन । गणेशाचा दशाक्षर अप्रतिम । नंतर अंतर्हित तो झाला ।।४७।। राजा सर्व प्रजाजनांसहित । व्रत करी अति हर्षित । फाल्गुन शुक्ल चतुर्थी तैं होत । प्रख्यात त्याच्या राज्यांत ।।४८।। शुक्ल कृष्ण चतुर्थींचें व्रत । करावें सर्व प्रजेनें सतत । ऐसा घोष राज्यीं करवित । हेमांगद श्रद्धाभावें ।।४९।। व्रतप्रभावें शूलव्यथाविहीन । जाहला तो राजा प्रसन्न । प्रजेचीं सर्व दु:खे नष्ट होऊन । समस्त सुखी जाहले ।।५०।। पुत्रपौत्रादि संयुक्त । रोगपीडाविवर्जित । धनधान्यादींनी युक्त । सर्व नांदती मोदानें ।।५१।। तदनंतर हेमांगद सेवत । विघ्नेशासी भक्तियुक्त । आदरें पूजी सतत । शांतिलाभ होऊनियां ।।५२।। पुत्रास राज्य देऊन । स्त्रीसहित झाला शांत मन । गणेशासी तन्मयत्व पावून । अंतीं मुक्त जाहला तो ।।५३।। भूमिवरी जे नर आचरित । चतुर्थीचें हें अद्भुत व्रत । ते स्वानंदलोकीं जात । भोगून भोग विशेषयुत ।।५४।। आता ऐक अन्य कथा या विषयांत । भाकर नाम नगरीं विप्र वसत । तो जातिदूषण कुकर्मरत । बाल्यापासून चोरी करी ।।५५।। परस्त्रीलंपट नित्य भोगित । पतिव्रतांसी बलात्कारें जगांत । शस्त्रधारी जात वनांत । ठार मारी नित्य प्राणी ।।५६।। द्विजादींची हत्या करित । द्रव्यलुब्ध तो अत्यंत । ऐसा तो पापकर्मरत । एके दिनीं गेला वनांत ।।५७।। तेथ एका वैश्या पाहत । त्यास मारण्या धावत । पळता पळता ओरडत । वैश्यपुत्र त्या वेळीं ।।५८।। त्याची ओरड ऐकून । मार्गस्थ चार प्रवासी येऊन । त्या चोर द्विजासी पकडून । राजदूतांकडे नेती ।।५९।। ते राजदूत

त्यास मारिती फार । मार मारून केला जर्जर । राजास दाखविती तो चोर । कोणासी दया अल्प नसे ।।६०।। त्या चोराची जात न ज्ञात। म्हणोनी द्विजासी ताडित । कारावासांत टाकित । तदनंतर आली फाल्गुन चतुर्थी ।।६१।। तेव्हां बंधनागारांत । निराहार तो नराधम असत । पंचमी दिनीं जाहला मृत । गणेशदूत नेती तया ।।६२।। गाणपत्य त्यास नेत । व्रत पुण्यप्रभावें स्वानंदपुरांत । तेथ विघ्नेश्वरा पाहून होत । ब्रह्मभूत तो द्विज ।।६३।। ऐसेचि नानाविध जन । ब्रह्मभूत झाले एक मन । त्यांचें चरित्र करण्या वर्णन । अशक्य असे सर्वथा ।।६४।। फाल्गुन वरदा चतुर्थी चरित । हें जो भावें ऐकत । अथवा वाचील श्रद्धायुक्त । विघ्नेश पुरवी सर्व काम त्याचे ।।६५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते फाल्गुनशुक्लचतुर्थीचरित्रवर्णनं नाम त्रयोदशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तेरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ म्हणे वसिष्ठाप्रत । ऐकिलें फाल्गुनी चतुर्थीचें माहात्म्य पुनीत । तरीही चित्त ना झालें तृप्त । म्हणोनी सांगा आणखी पुढें ।।१।। चैत्र शुक्ल चतुर्थीचें व्रत । वर्णन करावें मजप्रत । वसिष्ठ तेव्हां तें सांगत । बंगाल नगरीची कथा ।।२।। त्या बंगाल नगरांत । चंद्रप्रिय राजा प्रख्यात । शत्रुसंघास जिंकून राज्य करित । सागरान्त धरित्रीवर ।।३।। अन्य नृपांसी वश करित । सामंत राजे आज्ञारत । सर्व प्रजा स्वधर्म परायण वर्तत । राजा स्वयं परम धार्मिक ।।४।। वर्णाश्रमांचें रक्षण करित । हीन दंड्यासी दंड करित । चोरांचें भय ना राज्यांत । परि एक न्यून होतें ।।५।। नर नारी त्या राज्यांत ।

रोगग्रस्त झाले समस्त । वंध्यादि दोषांनी पीडित । म्हणोनि गेले नृपाकडे ।।६।। नागर नृपासी सांगती । आम्ही धर्म आचरितों नीती । आपुल्या आज्ञा पाळितों जगतीं । आपणही परम धार्मिक ।।७।। तथापि रोगदोषें पीडित । वंध्यादि दोष समस्त । धनधान्य विहीन वर्तत । आम्हीं सर्व कां राज्यांत ।।८।। पृथिवी जाहली रसहीन । वृक्षही सर्व फलहीन । गाई झाल्या दुग्धहीन । तुझ्या राज्यांत महामते ।।९।। धर्मशील राजा असत । तरी प्रजाजन असावे सुखयुक्त । परी तुमच्या राज्यांत । विपरीत सर्व घडत असे ।।१०।। म्हणोनि भूपाला आम्हा रक्षावें । रोगादीचें हरण करावें । आपणची आम्हां द्यावें । उत्तमोत्तम बळ या वेळीं ।।११।। त्यांचें वचन ऐकून । चंद्रप्रिय राजा दु:खी होऊन । प्रधानांवरी राज्य धुरा ठेवून । वनीं जाण्याची वांछा करी ।।१२।। तितुक्यामाजी तेथ येत । अष्टावक्र महायोगी अकस्मात । त्यांस पाहून विनययुत । चंद्रप्रिय राजा प्रणाम करी ।।१३।। पूजून तयास भोजन देत । पादसंवाहनीं झाला रत । नंतर म्हणे दु:खसंयुत । चंद्रप्रिय राजा अष्टावक्रासी ।।१४।। धन्य माझे मातापिता । धन्य जन्म तप यश ज्ञानादि तत्त्वतां । आपुल्या पदकमलांचें दर्शन होतां । धन्य सारें वाटे मज ।।१५।। परी एक असे दु:ख महान । ऐसें बोलून करी कथन । वृत्तांत सारा तो ऐकून । अष्टावक्र म्हणे राजासी ।।१६।। राजा तुझ्या राज्यांत । महत्पाप घडत । तेणें सर्व प्रजा होत । दु:खपूर्ण नि:संशय ।।१७।। चार पुरुषार्थांचा लाभ घडवित । ऐसें चतुर्थीचें व्रत । तें नष्ट झालें तुझ्या राज्यांत । म्हणोनि पीडा भोगिती सारे ।।१८।। अन्ती जातील नरकांत । सर्व प्रजाजन तुझ्यासहित । हें ऐकतां चंद्रप्रिय प्रार्थित । स्वामी दयानिधे मज तारावें ।।१९।। तें सांगावें उत्तम व्रत । कोणत्या देवाचें प्रिय असत । तेव्हां कृष्ण शुक्ल चतुर्थी व्रत । सविस्तर सांगे अष्टावक्र ।।२०।। सर्व

कार्यारंभीं हें व्रत । करावें धर्मकामार्थ जेणें लाभत । अन्तीं भक्त होत मुक्त । ऐसें माहात्म्य चतुर्थी व्रताचें ।।२१।। सर्व चरित्र ऐकून प्रार्थित । गणराजाचें स्वरूप अद्भुत । सांगावें आतां मजप्रत । तेणें भजेन सर्वभावें ।।२२।। अष्टावक्र तेव्हां म्हणत । गणेशस्वरूपाच्या वर्णनीं मीं अशक्त । तथापि सांगतों अल्प तुजप्रत । जेणें जाणशील त्यास भूपाळा ।।२३।। पूर्वीं मी एकदां तप करित । यत्नपूर्वक एकाग्रचित्त । तेव्हां सुरूप अप्सरा येत । माझें मन विचलित करण्या ।।२४।। त्यांचा अत्याग्रह पाहून । जाहलों मी कुपित मन । त्यांसी शापिलें तत्क्षण । मृत्युलोकीं तुम्हीं पडाल ।।२५।। तेथ चोरांनी ग्रस्त । तुम्ही अप्सरा व्हाल अत्यंत । ही माझी शापवाणी ऐकत । तेव्हां भयभीत त्या सर्व ।।२६।। त्यांनी मज विनविलें । परोपरीनें प्रार्थिलें । तेव्हां माझें मन द्रवलें । उ:शाप त्यांसी मी दिला ।।२७।। म्हणालों विष्णु जेव्हां यादवांत । अवतरेल कृष्णावतारांत । तेव्हां त्याच्या पत्न्या होऊन । घोर भयातून मुक्त व्हाल ।।२८।। अप्सरा नंतर निघून जाती । मीं तप आचरिलें भावभक्तीं । त्या तपप्रभावें माझ्या चित्तीं । अन्तर्ज्ञान परम स्फुरलें ।।२९।। तेव्हां तप सोडून मी आचरित । शमदमादि योगरत । समाधि साधून मोदयुक्त । अन्तीं स्थिरावलों स्वानंदीं ।।३०।। परी समरूपा विलोकित । जेव्हां मोहासी मीं अवचित । तेव्हां मीं सुविस्मित । शांतिलाभार्थ उत्सुक झालों ।।३१।। अकस्मात ऋभु योगी तेथ येत । वर्णाश्रमविहीन जो असत । त्यास पाहून हर्षसमन्वित । प्रणाम करून पूजिलें ।।३२।। महामुनीस म्हणालो सांप्रत । जाहलें तुमचें दर्शन पुनीत । धन्य माझें उग्र तप वाटत । जन्मज्ञानादिक सर्वही ।।३३।। तुमच्या पदस्पर्शें कृतकृत्यता वाटत। हें ऐकून मुनि म्हणत । काय वांच्छिसी महाप्राज्ञा मनांत । सांग तें मीं पुरवीन ।।३४।। तेव्हां कर जोडून विनीत । म्हणे योगशांति

सांगा मजप्रत । योगींद्रसत्तमा जेणें होत । चित्ताचें या समाधान ।।३५।। ऋभु तेव्हां मज सांगत । संयोग पंचधा जगतांत । सद् असत् सम नेतित । स्वसंवेद्ययोगें तो लाभेल ।।३६।। अयोग पाचांनी हीन । निवृत्तीनें पावती जन । त्यांच्या योगें सत्ययोग साधून । शांतिमार्गें कार्य सिद्धि ।।३७।। त्याच गणराजा जाणून । तूं भज महामते प्रसन्न । तेणें शांतिभव सौख्य लाभून । समाधानी होशील ।।३८।। त्याविण अन्य उपाय नसत। संयोगक गकार वर्तत । णकार अयोगवाचक असत । त्यांचा स्वामी गणेशान ।।३९।। ऐसें वेद वर्णिती । महामते ह्याची घ्यावी प्रचीती । मीही पूर्वी ऐशा रीतीं । नानायोगांत मग्न होतों ।।४०।। परी मनांत होतो भ्रांत । सहज भ्रांतीनें युक्त । त्या भ्रांतीचें स्वाधीनत्व पहात। सुविस्मित मी झालों ।।४१।। तेव्हां शंकरासी गेलों शरण । योगासाठी मी भक्तिपरायण । शंकरें उपदेश करून रक्षण । माझें केलें करुणेनें ।।४२।। गणेशाचें भजन सांगत । एकाक्षर विधान उपदेशित । त्यापरी मीं उपासना करित । शांतिलाभ मज झाला ।।४३।। ऐसें सांगून ऋभुमुनि देत । गणेशमंत्र मजप्रत । मीही एकाक्षर मंत्र जपता जगांत । शांतिप्राप्तीनें धन्य झालों ।।४४।। अष्टावक्र नंतर चंद्रप्रियाप्रत । द्वादशवर्ण मंत्रराज देत । विधिपूर्वक मंत्रराज अद्भुत । गणेशाचा परम पुनीत ।।४५।। तदनंतर अंतर्हित । अष्टावक्र तेथून होत । चंद्रप्रिय राजा होत । विघ्नेश्वर भजनीं निमग्न ।।४६।। त्यासमयीं प्रथम जी येत । शुक्ल चतुर्थी चैत्रमासांत । ती नगरजनांसहित । आचरिली त्यानें यथाविधी ।।४७।। तेव्हांपासून घोषणा करवित । आपुल्या प्रजाजनांत । शुक्ल कृष्ण चतुर्थी व्रत । विशेषें करावें सर्वांनीं ।।४८।। त्या व्रतप्रभावें रोगादिहीन । जाहले पुत्रसंपन्न जन । नानादोष दूर होऊन । आनंदें विहार ते करिती ।।४९।। चंद्रप्रिय पूजी अनन्यचित्त । गणेशातें अविरत । अन्तीं पुत्रास राज्यीं बैसवित ।

आपण गेला वनांत ।।५०।। स्त्रीसहित तेथ राहत । स्वल्प काळ तप करित । अन्तीं गणपाप्रत जात । स्वानंदलोकीं ब्रह्मभूत ।।५१।। क्रमानें जे भूमिसंस्थ असत । ते व्रत पुण्याईनें युक्त । ब्रह्मभूत ते समस्त । गणपतीच्या दर्शनें ।।५२।। आणखी एक असे वृत्तान्त । चैत्रशुक्ल चतुर्थी संबंधात । माळव्यांत शूद्रज पापी राहत । कोणी एक दुष्ट नर ।।५३।। तो द्रव्य लोभी पांथस्था मारित । सर्वस्व त्यांचें लुटित । त्याच्या पापांची संख्या नसत । वर्णिता ग्रंथविस्तार होय ।।५४।। एकदां तो वृक्षाग्रीं बैसत । शस्त्र घेऊन करांत । लोकांस गाठून वनांत । मारण्याचें व्रत त्याचें ।।५५।। परी त्या दिनीं सर्प चावत । म्हणोनी झाडाखाली उतरत । विषवेगें भयभीत । स्वगृहासी परतला ।।५६।। विषप्रभावें झाला मूर्च्छित । दैवयोगें त्या दिनीं असत । चैत्र शुक्ल चतुर्थी पुनीत । अन्नविवर्जित तो पापी ।।५७।। तैसाच तो पडला शूद्र गृहांत । पंचमीस झाला मृत । अन्तीं त्या पुण्यें जात । स्वानंदक पुरींत तो ।।५८।। अज्ञानें घडे जरी व्रत । तरी ऐसे नाना जन मुक्त होत । जे जे झाले ब्रह्मभूत । त्यांचें वर्णन करणें अशक्य मज ।।५९।। हें चैत्रचतुर्थीचें व्रत महिमान । जो ऐकेल वाचील प्रसन्न । तो सर्व ईप्सित काम लाभून । अन्तीं गणेश सायुज्य लाभे ।।६०।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते चैत्र शुक्ल चतुर्थीवर्णनं नाम चतुर्दशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चौदांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ प्रार्थी वसिष्ठाप्रत । आतां वैशाख चतुर्थीचें व्रत । सांगावें शुभद मजप्रत । कथामृत हे अद्भुत ।।१।। वसिष्ठ तेव्हां सांगती । गुर्जर देशीं भद्रक नगरी वसती । ब्रह्मप्रिय राजाची होती ।

सर्वशास्त्रज्ञ दानप्रिय जो देव ।।२।। द्विज अतिथींचे सेवन । शस्त्रास्त्रीं करी अवगाहन । सर्व नृपांसी वश करून । पृथ्वी मंडलाधिप झाला ।।३।। सर्वमान्य बलसंपन्न महामती । त्याची प्रथम पत्नी जगती । रजोदर्शनमात्रें मरता करिती । दुसरी पत्नी समशील ।।४।। तीही त्याच परी होता मृत । तिसरी चौथी पांचवीं विवाहित । परी पांचही भार्या झाल्या मृत । त्याच दोषें दशरथा ।।५।। तो ब्रह्मप्रिय राजा दु:खार्त । भार्यामृत्यूनें खिन्नचित्त । राज्य प्रधानांवरी ठेवुनि जात । आपुल्या गुरूसी भेटण्या ।।६।। अरण्यांत जाऊन श्वेतकेतूस भेटत । विनम्रभावें प्रणाम करित । उचित स्थानीं बैसवित । गुरू कुशल विचारिती तैं ।।७।। भोजनोत्तर राजासी विचारित । आगमन कां केलें अवचित । तेव्हां राजा सर्व सांगत । वृत्तान्त राण्यांच्या मृत्यूचा ।।८।। तो ऐकून श्वेतकेतू ध्यान करित । तेव्हां त्याला कारण समजत । तो म्हणे क्रोधसंयुत । नृपाधमा महापाप्या ऐक ।।९।। तुझ्या राज्यांत नष्ट झालें । चतुर्थीचें मुख्य व्रत भलें । म्हणोनि सर्व कर्म निष्फल झालें । अंतीं नरकीं पडशील ।।१०।। चतु:पदार्थ दातृत्वें ख्यात । चतुर्थीचें व्रत जगांत । त्या व्रतहीनत्वें तूं वर्तत । चतुष्टय पुरुषार्थ वर्जित ।।११।। श्वेतकेतूचें तें कोपयुक्त वचन । ऐकून नृप लज्जित उन्मन । ब्रह्मप्रिय म्हणे हात जोडून । अज्ञानानें हें घडलें ।।१२।। म्हणोनि क्षमा करावी । व्रत रीती मज सांगावी । कोणाची पूजा मीं करावी । हें सर्व मज सांगा ।।१३।। गणाधीश कैसा असत । ज्याचें हें व्रत महा अद्भुत । त्याचें स्वरूप जाणून त्वरित । भजन पूजन करीन त्याचें ।।१४।। श्वेतकेतू तेव्हां सांगत । राजा ऐक पूर्व वृत्तान्त । माझाच अनुभव तुज कथित । तेणें गणेशा जाणशील ।।१५।। पूर्वी मी तपोनिष्ठ अत्यंत । उद्दालक पित्यास नमून जात । तप आचरण्या वनांत । तपश्चर्या बहुविध केली ।।१६।। नंतर माझें तपाचें तेज पाहत । जनक

म्हणे तै मोहयुक्त । महायश तो शांतिदाता प्रेमयुक्त । बाळा माझें वचन ऐक ।।१७।। पुत्रा शांतिलाभार्थ तप सोडून । मी ब्रह्म ही वृत्ति महान। मनांत तूं बिंबवी प्रसन्न । विचार करी कोण मी हा ।।१८।। कुठून आलास कुठें जाणार । हें सांग मज समग्र । चिंतामणीस बाळा सुंदर। चित्तीं पहा हें ज्ञान व्हाया ।।१९।। पित्याचें वचन ऐकून । मी म्हणे त्यास वंदून । ताता मज स्वपुत्रास द्यावें ज्ञान । शांतिप्रद हें महान ।।२०।। चित्त शरीरीं कोठें असत । त्यांत चिंतामणि कैसा राहत । कैसें जाणावें तयाप्रत । हें सर्व सांगा मजला ।।२१।। वसिष्ठ महायोगी कथा सांगत। दशरथ आदरें ऐकत । उद्दालक स्वपुत्रास म्हणत । महाभागा ऐक सारें ।।२२।। योगशांतिप्रद हें ज्ञान । लाभतां सर्व योगज्ञ होऊन । ब्रह्मभूत तूं पावन । होशील यांत न संशय ।।२३।। चित्त पंचविध ख्यात । क्षिप्तमूढ विक्षिप्त । एकाग्र निरोध भूमिसंज्ञ असत । महामते ऐसें तें ।।२४।। त्यांत प्रकाशकर्ता निवसत । चिंतामणि तो हृदयांत । चित्तभूमिनाश होता लाभत । योगज्ञांसी तो देव ।।२५।। स्वयं बुद्धि चित्तरूप असत । चित्त भ्रांत करी उक्त । सिद्धि माया या दोन्ही वर्तत। गणेशाच्या दोन शक्ति ।।२६।। गणेश मायांचा क्रीडा कर्ता । म्हणून सांगतो तुज आतां । गणेश मंत्रानें त्यास भजता । पुत्रा शांति तुज लाभेल ।।२७।। ऐसे बोलून आरुणि देत । गणराजाचा मंत्र मजप्रत । एकाक्षर तो ध्यानादिसंयुत । साधना त्याची मी केली ।।२८।। त्यायोगें शांति मज प्राप्त । योगिवंद्य मी झालों जगांत । म्हणोनि ब्रह्मप्रिया नृपा तूं भक्तियुत । भजन करी गणनायकाचें ।।२९।। श्वेतकेतु म्हणे विधियुक्त। जपावा बत्तीस अक्षरी मंत्र पुनीत । गणेशाचा तूं श्रद्धायुत । तेणें ब्रह्मभूत होशील ।।३०।। तो गणेशमंत्र स्वीकारून । संपूर्ण विधियुक्त जाणून। श्वेतकेतूस प्रणाम करून । नृप परतला स्वनगरांत ।।३१।। परतता

वैशाखी चतुर्थी येत । प्रथम जी शुक्ल पक्षांत । ती आचरी नागरिकांसहित । हर्षयुक्त चित्तानें ।।३२।। राज्यांत सर्वत्र घोषणा करवित । सर्वांनी करावें व्रत । शुक्ल कृष्ण चतुर्थीचें पुनीत । सर्व प्रजेनें सर्वदा ।।३३।। स्वतः स्वस्त्रीसमायुक्त । गणनायकासी भजत । भार्येस जीवन लाभत । पुत्र प्राप्तीही जाहली ।।३४।। पुत्र होता तरुण बलसंपन्न । राज्य त्यास देऊन । राजा निवृत्त होऊन । मंत्र जप करी अनन्यभावें ।।३५।। पूजन मनन सतत करित । अन्तीं होई ब्रह्मभूत । ब्रह्मप्रिय नाव सार्थ होत । त्या थोर राजाचें ।।३६।। त्याच्या राज्यांत समस्तजन । चतुर्थी व्रतानें होत पावन । तेही क्रमें ब्रह्मभूत होऊन । स्वानंदक पुरीं गेले ।।३७।। उद्दालक श्वेतकेतु विख्यात । गाणपत्य म्हणोनि जगांत । महा प्रभू अवधूत । श्वेतकेतु पुढे काय करी ।।३८।। एकदा आरुणि आश्रमांत । होता आपुल्या स्त्रियेसहित । तेथ एक द्विज येत । सर्व शास्त्रीं विशारद जो ।।३९।। तो द्विज आरुणीच्या भार्येप्रत । कामविव्हल प्रार्थित । मैथुन सुख द्यावें मजप्रत । सुंदरि तूं सत्वरी ।।४०।। तें ऐकता क्रोधयुक्त । श्वेतकेतु होता त्यांस सांगत । आरुणि आपुल्या पुत्राप्रत । बाळा क्रोध करू नको ।।४१।। अरे पुत्रा स्त्रिया अवृत । ऐसें असे शास्त्रमत । तें ऐकून श्वेतकेतु म्हणत । रोषभरें स्वपित्यासी ।।४२।। ऐसें जरी असत । तरी एक पतीस स्त्री कैसी वरित । म्हणोनि ब्रह्मदेवें न केलें शाश्वत । नियम ऐसें मज वाटे ।।४३।। असमंजस हें जाणून । मी आता घालतो मर्यादा या लागुन । यापुढतीं कामविचारें जो जन । परस्त्रीशी स्पर्श करील ।।४४।। त्यास स्त्रीहत्येचें पाप लागेल । ऐसा धर्मनियम नूतन अमल । तैसेचि जी पति सोडून रत होईल । कामिनी परपुरुषासी ।।४५।। ती त्या संभोगानें लाभेल । पतिहत्यासम पातक सबल । माझी गणेशभक्ति दृढ असेल । सत्वर

सत्य होईल वचन हें ।।४६।। ऐसी मर्यादा श्वेतकेतु घालित । तेव्हांपासून पतिव्रताव्रत । रूढ जाहले जगांत । विनायकाच्या प्रसादाने ।।४७।। ऐसें हें उद्दालकाचें चरित । मी सांगितले तुज प्रसंगोपात्त । आतां चतुर्थीचें माहात्म्य अद्भुत । अपूर्व आणखी ऐक नृपा ।।४८।। कोणी एक द्विज महाराष्ट्रांत । परस्त्रीलंपट असत । त्यास्तव मद्यपान करित । चोरी करून धन मिळवी ।।४९।। सदा हिंसा आचरित । जाहला नाना पापांत रत । परस्त्रियांसी भोगी सतत । एकदां गेला शूद्रगृहीं ।।५०।। कामविव्हल तो शूद्रभार्येसहित । जाहला धन देऊन रत । शूद्र नव्हता गावांत । दूर प्रवासा तो गेला असे ।।५१।। ऐसा कांही काळ जात । द्विज शूद्रपत्नीस भोगित । तिच्याच घरीं निवसत । कामांध होऊन त्या वेळीं ।।५२।। परी जेव्हां तो शूद्र गृहीं परतत । तेव्हां जाणून वृत्तान्त । शस्त्राघातें द्विजाधमा मारित । क्रोधांध होऊन तत्क्षणीं ।।५३।। त्या दिवशीं चतुर्थी असत । वैशाख शुद्ध पुनीत । शस्त्रानें विद्ध होत । द्विज तो राहिला उपाशी ।।५४।। अन्नादि त्यास न मिळत । पंचमी तिथीस तो मरत । त्या पुण्यें स्वानंद लोकांत जात । सत्कार बहुत तेथें त्याचा ।।५५।। ऐसा महापाप परायण । परी चतुर्थी व्रत अज्ञानें घडून । जाहला ब्रह्मभूत तो पापी ब्राह्मण । तरी ज्ञान्यांची काय कथा ।।५६।। नाना जन करून व्रत । जाणून अथवा नकळत । ते सर्वही झाले ब्रह्मभूत । ऐसें वर्णनातीत हें माहात्म्य ।।५७।। हें वैशाखी शुक्ल चतुर्थीचे व्रत आख्यान । असे अत्यंत पावन । ऐकेल वा वाचील एकमन । त्यास ईप्सित सर्व लाभे ।।५८।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते वैशाख शुक्ल चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम पंचदशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पंधरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । वसिष्ठ गुरो ज्येष्ठ शुक्ल चतुर्थीचें व्रत । आता सांगावें मजप्रत । वैशाख चतुर्थीचें महिमान पुनीत । ऐकून उत्सुक माझें मन ।।१।। वसिष्ठ तेव्हां कथा सांगत । आंध्रप्रांती शेषपुरांत । कर्दम नाम नृप असत । नानाधर्म परायण ।।२।। तो शस्त्रास्त्रनिपुण नीतियुक्त । भूमंडळ स्ववश करित । समुद्र वलयांकित पृथ्वी असत । तयाच्या प्रबल शासनाखालीं ।।३।। दैवयोगें त्यास जडत । प्रमेह रोग अति दारुण जगांत । अग्निसम तो त्यास जाळित । पापप्रेरित तो रोग ।।४।। त्या रोगानें अति पीडित । राजास मूत्रोत्सर्गी दाह होत । बहुधा मूत्रोत्सर्ग बंदही होत । कर्दम रडे त्या दाहानें ।।५।। नाना उपाय तो करित । परी तो रोग ना होय शांत । तेव्हां राज्य सोडून सस्त्रीक जात । वनांत कर्दम दुःखभरें ।।६।। या वनांतून त्या वनांत । सिंहवाघादींनी युक्त । तो सतत हिंडत । मृत्युसम दारुण पीडा भोगी ।।७।। तेथ एकदा भरद्वाज येत । महायश विप्रेंद्र अवचित । त्यास पाहून विनीत । सस्त्रीक प्रणाम कर्दम करी ।।८।। हात जोडून तेथ स्थित । अति दाह होऊन पीडित । धरणीवरती पडत । आक्रंदन करी विवशमनें ।।९।। त्याची ती अवस्था पाहत । तेव्हां ध्यान लावून बघत । योगीन्द्र भरद्वाज जाणत । कारण त्याच्या पीडेचें ।।१०।। दया येऊन कर्दमास म्हणत । राजेंद्रा ऐक हितयुक्त । वचन माझें तरी त्वरित । दुःखविहीन तूं होशील ।।११।। चतुर्थीचें व्रत नष्ट झालें । तुझिया राज्यीं म्हणून घडलें । पाप जें भयंकर तेणें अनुभविलें । अति दारुण दुःख तूं ।।१२।। म्हणोनि प्रजाजनांसहित । महामुनी म्हणे तू करी हें व्रत । त्या पुण्यें दुःखरहित । होशील तूं राजेंद्रा ।।१३।। भरद्वाजाचें ऐकून वचन । नृप करी त्यास वंदन । व्रताचरणाचा विधि पावन । विनम्रपणानें विचारी ।।१४।। सर्वज्ञ अशा भगवंता । मजवरी कृपा करी आता । अनुकंपा वाटली जरी चित्ता । तरी माहात्म्य

सांगा व्रताचें ।।१५।। भरद्वाज तेव्हां त्यास सांगत । संकष्टी वरद चतुर्थीचें व्रत । चार पुरुषार्थ जेणें लाभत । कार्यारंभीं हें करावें ।।१६।। हें व्रत जे न करिती । ते चतुर्विध पुरुषार्था मुकती । अन्तीं नरकांत जाती । यांत संदेह कांहीं नसे ।।१७।। चतुर्थीचें माहात्म्य ऐकत । नृप गणेशाच्या स्वरूपज्ञानीं उद्यत । तेव्हां भरद्वाज त्यास सांगत । वेदादिकही येथ असमर्थ ।।१८।। तथापि सुखप्रद अल्प सार । सांगतों तुजला मोदकर । माझेंच आचरण उग्र । तपश्चर्यामग्न होतें पूर्वीं ।।१९।। उग्र तप मीं आचरित । तेव्हां अंतर्ज्ञान शक्ति लाभत । तप सोडून मीं तैं होत । शमयुक्त दमादिपर ।।२०।। जडोन्मत्तादि मार्गांत । राहिलों मी योगस्थित । अन्तीं क्रमानें स्वानंदात । संपूर्ण शांति प्राप्त झाली ।।२१।। त्यापासून पुढें भेदादिक संजात । तें पाहून मीं क्षुभित । शांतिहीन जाहलों तैं अकस्मात । रैवत योगी तेथ आले ।।२२।। माझ्या आश्रमीं ते येत । मीं त्यांसीं प्रणाम करित । पूजोनियां बैसवित । उचित आसनीं महामुनीसी ।।२३।। म्हणे आज कृतकृत्य वाटत । जन्म माझा धन्य जगांत । आपुलें दर्शन लाभलें पुनीत । योगशांति मज सांगा ।।२४।। योगीन्द्रांचे गुरु आपण । सांगा शांति साधन महान । ज्याचें करता अनुष्ठान । शांतियोगधारक मी ।।२५।। रैवत तेव्हां मज सांगत । स्वानंद पंचधा ख्यात । सदसत्सम नेतीत । चारांच्या संयोगे स्वस्वरूप ।।२६।। अयोग स्वस्वरूपांत । तैसाचि स्वरूपहीनही संमत । त्यांच्या योगें भरद्वाजा होत । योग शांतिप्रदायक ।।२७।। स्वसंवेद्य गकार असत । 'ण'कार योग नामें ख्यात । त्यांचा स्वामी हा गणेश वर्तत । ब्रह्मणस्पति वाचक ।।२८।। त्यास भज तूं महाभागा सतत । तेणें शांतिलाभ तुजप्रत । अन्यथा शेकडों वर्षें तू भ्रमयुक्त । सार कदा न जाणसी ।।२९।। ऐसें रैवत मुखातुन ऐकून । ज्ञान तें परम महान । त्यापरी करिता अनुष्ठान । शांति

लाभ मज झाला ।।३०।। गाणपत्य मी दृढव्रत । आता संचार करी जगांत । ऐसें सांगून मज देत । एकाक्षर मंत्र गणेशाचा ।।३१।। विधियुक्त न्यासादिसंयुत । मी तो भक्तिभावें स्वीकारित । रैवताची पूजा करित । नंतर तो स्वेच्छा स्थळीं गेला ।।३२।। मी भरद्वाज गणेशासी भजत । अनन्य मनें सतत । अन्तीं शान्ती लाभली पुनीत । भजनीं रत तै गणेशाच्या ।।३३।। ऐसीं दहा वर्षें जात । तेव्हां विघ्नेश मजपुढें प्रकटत । त्यास पाहून पूजा करित । अष्टनामस्तोत्रें स्तुति केली ।।३४।। तेव्हां मज गाणपत्य करून । तो स्वानंदलोकीं गेला निघून । गणेशासी तेव्हांपासून । भजतों मी भक्तिभावें ।।३५।। ऐसें सांगून कर्दमास देत । अष्टाक्षरमंत्र विधियुक्त । नंतर जाहला अंतर्हित । भरद्वाज महामुनी ।।३६।। कर्दम स्वगृहीं जात । गणेशास पूजी हर्षयुक्त । तदनंतर ज्येष्ठ शुक्ला येत । चतुर्थी तो आचरितसे ।।३७।। समस्त नागरांसमवेत । राजा करीतसे तें व्रत । वरदा संकष्टी उभय सतत । प्रमेहरोग त्याचा दूर झाला ।।३८।। जाहला तो दु:ख निर्मुक्त । पुढें पुत्रास राज्य देत । आपण वाटिकेंत राहून निवृत्त । सस्त्रीक भजे सर्वभावें ।।३९।। गणेशासी तन्मयता पावत । त्याचे प्रजाजनही होत । ब्रह्मभूत ते समस्त । व्रतपुण्यप्रभावानें ।।४०।। दशरथा अन्य कथा तुजप्रत । सांगेन सिद्धिप्रद ती जगांत । गौडदेशीं विप्र असत । महापापी अत्यंत ।।४१।। तो वनांत जाऊन लोकांस वधित । द्रव्य त्यांचें सारे लुटित । योनिलंपटभावें दूषवित । अनेक स्त्रिया तो महादुष्ट ।।४२।। वनांत एकाकिनी पाहून । ब्राह्मणी क्षत्रिया व वैश्या प्रसन्न । तैसीच शूद्रा पाहून । आलिंगून त्यांसी उपभोगी ।।४३।। ऐसें नानाविध पाप करित । तो ब्राह्मण सतत । तेव्हा एकदा त्या समीप येत । मारण्यास कोणी बळी ।।४४।। पापी ब्राह्मण भयें पळत । हाहा:कार मुखें करित । तो नाद ऐकून येत ।

पाच पुरुष त्या स्थळीं ।।४५।। त्यांनी त्यास विद्ध करून । शस्त्राघातें जर्जर करून । धरणीतलावर दिला फेकून । ज्येष्ठ शुक्ल चतुर्थीला ।।४६।। त्या दिवशीं उपोषण घडत । दैवयोगें त्या द्विजाप्रत । दारुण पीडेनें होऊन त्रस्त । पंचमीस तो मृत झाला ।।४७।। अज्ञानपणें घडलें व्रत । तरीही तो होत ब्रह्मभूत । चांडाळही तर ज्ञानीजन पुनीत । त्यांची महती काय वर्णू ।।४८।। ऐसे बहुविध जन । व्रतप्रभावें भोग भोगून । ऐहिकानंतर स्वानंदांत निमग्न । अपार महिमा या व्रताचा ।।४९।। हें ज्येष्ठ चतुर्थीचें व्रत । तैसेंचि त्याचें माहात्म्य अद्भुत । जो ऐकेल अथवा वाचित । त्याचे मनोरथ पूर्ण होती ।।५०।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते ज्येष्ठ शुक्ल चतुर्थी माहात्म्यवर्णनं नाम षोडशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सोळांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ विचारी वसिष्ठांप्रत । आषाढ शुक्ल चतुर्थीचा महिमा अद्भुत । वसिष्ठ तेव्हां त्यास सांगत । मैथिल प्रांतातील कथा ।।१।। गंडकी नाम महानगर । मैथिल प्रांतांत सुंदर । तेथ भद्रसेन नृपवर । अमित तेज राज्य करी ।।२।। शस्त्रास्त्रांत निपुण असत । तो भूमंडळ सर्व जिंकित । परराष्ट्रांचें अवमर्दन करित । सार्वभौम तो भद्रसेन ।।३।। समुद्रवलयांकित अवनीवर । राज्य करी तो धर्मधुरंधर । नीतिनिष्ठ अति उदार । विनीत द्विज देव अतिथिप्रिय ।।४।। त्याच्या वश नृप समस्त । नराधिपास त्या सेवित । अपार सेना त्याची असत । अन्य नृप त्यास कर देती ।।५।। परी त्याच्या राज्यांत । पोपट टोळ उंदीर भक्षित । धान्य वस्त्रादिक समस्त । तेणें विनाश ओढवला ।।६।। त्यांच्या नाशार्थ यत्न करित । भद्रसेन प्रतापवंत । अस्त्रांनीं यत्नपर मारित ।

बहुत शुकशलभ मूषकांसी ।।७।। अग्न्यस्त्रांनी त्यांसी जाळित । परी ते पुन:पुन्हा उत्पन्न होत । भद्रसेन विस्मित चित्तांत । काय करावें त्या न कळे ।।८।। घरोघरीं शलभादि संचरत । नगरजन त्रस्त बहुत । धान्य वस्त्रादी विनष्ट । असमर्थ नृप प्रतिकारार्थ ।।९।। तेव्हां तो जात वनांत । मानसीं अतीव दु:खित । उपोषण करी तप आचरित । शिवशंकराचें स्मरण करी ।।१०।। रौद्रभावें पूजित । स्तुति उत्तमोत्तम करित । ऐसें एक वर्ष जाता येत । बकदाल्भ्य त्या स्थळीं ।।११।। तो महायोगी दैवयोगें भेटत । राजा त्याचें पूजन करित । भोजनादी त्यास देत । विनययुक्त त्यासमयीं ।।१२।। नंतर दु:खयुक्त चित्तें म्हणत । स्वामी माझिया राज्यांत । मूषक शलभ शुक अत्यंत । पीडा देती सर्वांसी ।।१३।। ते धान्य वस्त्रादिक भक्षिती । विनाशाची ना गणती । त्यांच्या उपायांची परिणती । नैष्फल्यात जाहली ।।१४।। म्हणोनि राज्य सोडून वनांत । दु:खें मी निवसत । शंकराचें भजन करित । तैं दर्शन आपुले जाहलें ।।१५।। माझ्या तपप्रभावें दर्शन । महामते जाहलें तुमचें पावन । आता उपाय सांगून । कृपा करावी मजवरी ।।१६।। वसिष्ठ म्हणती दशरथाप्रत । ऐकून भद्रसेनाचें प्रार्थित । महायश गाणपत्य तो सांगत । बकदाल्भ्य त्या नृपासी ।।१७।। शिवशंकरें मज पाठविलें । तुजसाठीं ऐक वचन भलें । दु:खनाशकर जें शिवें बोलिलें । राजसत्तमा भद्रसेना ।।१८।। तुझ्या राज्यांत व्रत । चतुर्थीचें विनष्ट असत । म्हणोनी हें विघ्न नाडित । सांप्रत तुजला नृपवरा ।।१९।। प्रजा भयोद्विग्न समस्त । राजाच्या दोषानें होत । तूं राज्यकर्ता पापी असत । अन्तीं जाशील नरकांत ।।२०।। म्हणोनि सर्व कार्यारंभांत । तें करावें भक्तिभावें व्रत । चार पुरुषार्थ तें देत । विघ्नहरण करीतसे ।।२१।। जरी हें चतुर्थीचें व्रत । केलें नाही श्रद्धायुक्त । तरी सर्व कर्म व्यर्थ होत । चतु:पदार्थहीनत्वें ।।२२।।

ऐसें बोलून महिमान । बकदाल्भ्य भद्रसेनासी सांगून । राजाची विनंति सन्मानून । गणाधीश स्वरूप सांगे त्यासी ।।२३।। आपुला जो पूर्व वृत्तान्त । तोच त्यास कथन करित । जो ऐकता गणराज ज्ञानांत । सुनिपुण होशील म्हणे ।।२४।। पूर्वी मीं वायुमात्र प्राशून । केलें तप महान । तेव्हां चराचर भयातुर उन्मन । माझ्या तप:प्रभावें ।।२५।। तथापि मी तप ना सोडिलें । पुढें मज विश्वरूप दर्शन झालें । तेणें ज्ञानभाव उदेले । तप सोडून योग आचरी ।।२६।। जडोन्मत्तादिकीं रत । शमदमपर योग आचरत । मनीं निग्रह ठेवित । अत्यंत निष्ठा ठेवून ।।२७।। तदनंतर मीं अतिमोहें पहात । स्वाधीन रूप शून्य साक्षात । सहज ब्रह्मांत होतो स्थित । जरी मी हर्षपूर्ण सर्वदा ।।२८।। तें शून्य पाहून झालों भ्रांत । म्हणे हें कैसे आलें ब्रह्मांत । म्हणोनि शंभूस शरण जात । स्तवन करी विविध परीनें ।।२९।। शंकर जाहले जेव्हां प्रसन्न । तेव्हां म्हणे हात जोडून । योगस्वरूप जाणण्या गहन । तें विशद सांगा मजला ।।३०।। सत्य असत्य समान । सहजयुत स्वानंदापासून । उद्भवती तीं जाणून । निजात्मबोधे नंतर ।।३१।। संयोगांत स्वस्वरूप जाणावें । वेदवादानुसार आघवें । अयोग होता नष्ट होय स्वभावें । सर्व संयोग ।।३२।। संयोग अयोगांचा योग होत । योगशांतिप्रद अत्यंत । ऐसें योगिजन सांगत । योग सेवेनें योगमार्गी ।।३३।। योग शांतिमय ब्रह्मनायक वर्तत । गणेश हाचि देव अद्भुत । त्यास भज तूं विधानयुक्त । ब्रह्मभूत तैं होशील ।।३४।। संयोग तो गकार । योग वाचक णकार । त्यांचा स्वामी हा थोर । गणाधीश ऐसी वेदोक्ती ।।३५।। नंतर वनांत जाऊन । केलें गणराजाचें ध्यान । जप ध्यानपरायण प्रसन्न । शांतिलाभ झाला गणेशकृपेनें ।।३६।। ध्यान जपादींचें महिमान । त्याचा अद्भुत अनुभव येऊन । चित्त जाहले शांत उन्मन । तरिहि पुजा न सोडिली

।।३७।। नित्य पूजनीं आसक्त । सदैव चित्तानें त्यास ध्यात । तेव्हां मज दाखवित । शुंडाविराजित स्वरूप ।।३८।। आनंदें मी प्रणाम केला । गणराज सर्वभावें स्तविला । मज भक्तिभाव देऊन झाला । गणाधीश अन्तर्धान ।।३९।। तेव्हांपासून गाणपत्य ख्यात । भद्रसेना मी जगांत । ऐसें सांगून पंचाक्षर मंत्र देत । नंतर अन्तर्धान पावला ।।४०।। बकदाल्भ्य होत अन्तर्धान । भद्रसेन स्वपुरीं जाऊन । शुक्ल कृष्ण चतुर्थीचें व्रत महान। करू लागला श्रद्धेनें ।।४१।। त्यायोगें शुक मूषक शलभ नष्ट होत । लोक झाले धनधान्ययुक्त । दु:खें दूर होऊन समस्त । अन्तीं गेलें स्वानंदलोकीं ।।४२।। ते सर्व ब्रह्मभूत । राजा स्वपुत्रासी राज्यीं स्थापित। सपत्नीक वनीं जात । तेथ भजे गणराजासी ।।४३।। अन्तीं तोही स्वानंदलोकांत । सपत्नीक व्रतप्रभावें जात । अन्यही असे एक चरित । पुण्यकारक तें ऐक ।।४४।। आषाढी वरदा चतुर्थीचें व्रत । सुखप्रद असे अत्यन्त । एक तरुण वंग देशांत । वाणिज होता पापकर्मा ।।४५।। स्वधर्म सोडून दुष्ट कर्मांत । सदैव तो दुष्ट रमत । द्यूत खेळत मदिरा पीत । नित्य हिंसा करीतसे ।।४६।। बळेंच परस्त्रियांस पकडून । जरी वश न झाल्या त्या खिन्न । प्रतिदिनीं भोगी आणून । त्याच्या पित्यास हें न रुचें ।।४७।। पिता करी तिरस्कार । परी तो दुराचार । आपल्या जनकास विष देत उग्र । त्यायोगें पिता मरण पावला ।।४८।। नंतर मातेप्रती जाऊन । घेतलें काढून सर्व धन । लोकांसि कळतां वृत्त उन्मन । झाले दु:खित सकळ ।।४९।। त्या दुष्टाचें चरित । ऐकून जाणून तें त्वरित । श्रेष्ठजन तेव्हां जात । राजासमीप सर्व मिळून ।।५०।। त्या वाण्याचा वृत्तान्त । ऐकून नृप झाला क्षुभित । त्यास पकडण्या पाठवित । अधिकारी जनांसी ।।५१।। तेव्हां नृपाधिकारी जाती । त्या वाण्यासी पकडिती । अपराधांची झाली गणती । नृपे दिधला निर्णय ।।५२।। म्हणे ह्यास

चढवा सुळावर । अविलंबित आजचि सत्वर । नृपाज्ञा ती भयंकर । तैशापरी सेवक करिती ।।५३।। दैवयोगे ती होती । आषाढी शुक्ला चतुर्थी तिथी । निराहार जलहीन लटकत दु:ख अती । फांसावरी त्या दुष्टासी ।।५४।। पंचमीदिनीं पीडेनें युक्त । तो दुर्जन मरत । अज्ञानें पुण्यव्रत घडत । तेणें स्वानंद लोकीं गेला ।।५५।। स्वानंदीं गणपास पहात । स्वयं होत ब्रह्मभूत । ऐशा प्रकारें व्रतप्रभावें लाभत । अन्य जनही ब्रह्मपद ।।५६।। अनेक वर्षयुत वर्णन । केलें तरी असंभव मान । इतुकें असंख्यात महिमान । चतुर्थी व्रताचें हें असे ।।५७।। जरी योगपूर्वक साधित । चतुर्थी देवी प्रसन्न होत । वरदा साधकास ब्रह्मपद प्राप्त होत । यांत नवल कोणतें ।।५८।। जो हें आषाढी वरद चतुर्थीचें चरित । ऐकत किंवा वाचील भक्तियुक्त । त्यास ईप्सित फळ लाभत । पुरुषार्थ चतुष्ट्याचें ।।५९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते आषाढ शुक्ल चतुर्थीचरितवर्णनं नाम सप्तदशोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सतरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । दशरथाच्या मनांत । श्रावण वरदा कथेचे औत्सुक्य असत । म्हणोनि तो प्रार्थना करित । वसिष्ठांची पुनरपि ।।१।। सांगावी कथा ती मजप्रत । वसिष्ठ तेव्हां त्यास सांगत । अंगदेशीं एक नगर असत । श्रीमत्शततार नांवाचें ।।२।। तेथ अश्वसेन नाम नृपती । राज्य करी धर्मनीती । दानशूर ऐसी ख्याति । होती त्या जनवल्लभाची ।।३।। देवविप्र अतिथीस भजत । अति पराक्रमी तो व्रतयुक्त । शस्त्रास्त्रांनीं पृथ्वी जिंकित । सार्वभौमत्व तयाचें ।।४।। समस्त राजे वश करून । करभार मिळवी अमित धन । ऐसें त्याचें बल गहन । परी

एकदा नवल घडलें ।।५।। एके दिनीं अकस्मात । राजा झाला ज्वरपीडित । अतिदाहक ज्वर असत । निद्रा रात्रीं न येई तया ।।६।। नाना उपाय त्यानें केले । परी ते सर्व व्यर्थ झाले । सदैव तापानें कष्टलें। शरीर त्या भूपतीचें ।।७।। ऐसे उलटले एक संवत्सर । ज्वरपीडा होत दुर्धर । भूप झाला अस्थिपंजर । दु:खयुक्त तो विलाप करी ।।८।। विष घेऊन देहपात । करण्यास झाला उद्युक्त । तेव्हां त्याच्याकडे अकस्मात । आला देवल योगी दैवें ।।९।। त्यास पाहून प्रणाम करित । बांधवांसहित पूजित । अन्नादीनीं करी तृप्त । नंतर म्हणे अश्वसेन ।।१०।। धन्य माझा जन्म कर्म । धन्य मातापिता दान । धन्य सर्वही अन्य दर्शन । आपुले योगिराजा होतां ।।११।। मी ज्वरें पीडित अनिवार । विषप्राशना झालों आतुर । इतुक्यामाजीं आगमन शुभकर । योगिसत्तमा झालें तुमचें ।।१२।। आपुल्या दर्शनमात्रें मी मुक्त । आत्महत्येचें पाप न मजप्रत । म्हणोनि विष प्राशितों त्वरित । जातों आता स्वधामासी ।।१३।। ऐसें बोलून रडे करुण । तेव्हा देवल मुनीचें द्रवलें मन । भावगंभीर तो म्हणे वचन । सत्शास्त्रार्थ कोविद ।।१४।। महीपते तुझ्या राज्यांत । चतुर्थीचें नष्ट झालें व्रत । त्या पापें तूं रोगयुक्त । ज्वर पीडित झालासी ।।१५।। जरीं करिसी विषपान । तरी होईल देह पतन । अन्तीं नरकांत गमन । होईल तुझें प्रजानाथा ।।१६।। चार पदार्थप्रद पूर्ण व्रत । सर्वादी जें संमत । ऐसें चतुर्थीचें व्रत । न करितां कर्मे निष्फळ ।।१७।। तूं केलेंस जें असंख्यात । पुण्यकर्म या जगांत । तें सारें झालें फलरहित । चतुर्थी व्रताच्या अभावानें ।।१८।। तदनंतर चतुर्थीचें महिमान । कथा रोचक एक सांगून । निवेदितां अश्वसेन । चकित झाला मानसीं ।।१९।। म्हणे व्रतमाहात्म्य हें परम अद्भुत । ऐकतां कुतूहल चित्तांत । गणेशाचें महिमान पुनीत । आणखी सांगा मजप्रती ।।२०।। देवल म्हणती नृपाप्रत ।

गणेश्वराचें महात्म्य अद्भुत । अवर्णनीय तें असत । उपाधियुत अल्प सांगतों ।।२१।। माझें पिता असित । त्यांच्या मुखांतून जें निःसृत । तें मी ऐकिलें पुनीत । सर्वसिद्धिकर योगयुक्त ।।२२।। ब्रह्मप्रकाशक पूर्ण पावन । तें मी तुजसी सांगेन । पूर्वी मीं तप केलें महान । अनेक वर्षे निष्ठेनें ।।२३।। तेव्हां जैगीषव्य नाम येत । महायोगी शैव मजप्रत । मी त्यांचा सत्कार करित । पूजन करूनी स्तविला तैं ।।२४।। माझ्या आश्रमांत न बोलला । कांहींच तो योगी भला । त्याचें चिन्ह पाहून मनाला । बोध माझ्या जाहला ।।२५।। अकर्मकारक तो असत । देहरक्षण तत्पर जगांत । ध्यानादि शून्यभावें वसत । भ्रष्ट तैसा शांति योगहीन ।।२६।। ऐशा त्या योग्यास घरीं सोडून । मीं गेलों समुद्रतळीं तत्क्षण । माझें चित्तविचार जाणून । तोही आला समुद्रजलांत ।।२७।। तो कोणत्या मार्गें आला । आकाशीं मज न दिसला । ऐसा विस्मय मज वाटला । पुढे ऐक काय झालें ।।२८।। त्यास सोडून समुद्रजळांत । मी अवचित गेलों स्वर्गमंडळांत । तेथही जैगीषव्य मज भेटत । देवही पूजा करिती त्यांची ।।२९।। ऐशा नानाविध मार्गें स्वर्गांत । विविध परींच्या मी जात । तेथही महायोगी तो येत । पुढें अन्तर्धान तो पावला ।।३०।। ते पाहून सिद्धसंघाप्रत । मी औत्सुक्यें विचारित । तेव्हां ते मज सांगत । ब्रह्मलोकांतही गति याची ।।३१।। तें ऐंकतां खेदयुक्त । मी परतलों आश्रमांत । तेथ गृहांमध्ये स्थित । पाहिला मीं तो महायश ।।३२।। त्यास पूजून वंदित । योगपरायणा त्या प्रार्थित । तारावें आतां मजप्रत । कुशिष्या ह्या संसारीं ।।३३।। मी छलनयुक्त असत । दयानिधे तुम्ही कृपावंत । होऊन उद्धरा मज त्वरित । प्रार्थना ऐकून तो म्हणे ।।३४।। जैगीषव्य मज सांगत । हिंसात्मक कर्म नसे उचित । प्रयत्न सारा सोडून त्वरित । शमदमांनी युक्त व्हावें ।।३५।। मीं ब्रह्म हें जाणून । करावें

आयासरहित मन । ज्याच्या आज्ञावश जग महान । त्यास भजावें सर्वभावें ।।३६।। ऐसें करितां योगी होशील । संशय सारा फिटेल । वचन ऐसें निर्मल । बोलून अन्तर्धान पावला तैं ।।३७।। मी हिंसा सोडून तेथ वसत । सोडिलीं यज्ञकर्मे समस्त । तें जाणून पितर रडत । स्वर्गामाजीं समस्त ।।३८।। अहो देवलें काय केलें । यज्ञ कर्म उपेक्षिलें । आम्हां निराधार केलें । कोण पोशील आम्हां आतां ।।३९।। आता श्राद्धकर्म थांबलें । आमुचें अन्नपाणी खुंटलें । पितरांचें त्या दर्शन झालें । दया उपजली मम चित्तांत ।।४०।। कर्म करण्या झालों उद्युक्त । पितरांसी पाहून तैं दु:खित । मी पाहिलें तेव्हा अद्भुत । रडूं लागल्या वृक्षवेली ।।४१।। अहो देवलाची क्रूरता । आम्हांसी अभय देऊन आतां । पुनरपि छेदील पितरांकरिता । निर्लज्ज हा दुर्मती ।।४२।। यज्ञकर्मात आम्हां दहन । करील हा क्रूर मन । तें ऐकतां खिन्नता वाटून । धर्मसंकटीं पडलों मी ।।४३।। विचार करून तदनंतर । जाहलों शमदमपर । सर्वांसी अभयव्रतपर । योगसेवेनें कर्म केलें ।।४४।। कर्मे सहज योगांत । ब्रह्मांत मी झालों संस्थित । तेथ स्वाधीनता होतां प्राप्त । पुनरपि झालों शांतिहीन ।।४५।। पितरांप्रत जाऊन । योगीन्द्र ज्यांचें करिती स्तवन । ऐशा असितासी प्रणाम करून । सनातन ब्रह्म विचारिलें ।।४६।। योगशांतिप्रद ब्रह्म सांगत । पूर्ण तें तो योगी मजप्रत । पुत्रा संयोगापासून उद्भवत । स्वसंवेद्यात्मकापासून ।।४७।। तें चतुर्विध समुत्पन्न । समाधिद सारें सांगून । अयोगांत संयोग महान । पाहती योगीजन केव्हां ।।४८।। संयोग अयोगाचा योग । तोच शान्तिप्रद योग । गणराज तो स्वरूप पारग । त्यास भज तूं नित्य आदरें ।।४९।। योगिराज त्याचें वर्णन करिती । शांतिद ऐसें जगती । योगस्वरूप तोच जगतीं । संयोगात 'ग'काराख्य ।।५०।। अयोगरूपीं णकार असत । त्यांच्या योगे गणाधीश

ज्ञात । ऐसा जाणावा विबुधीं विश्रांत । आसितें ऐसा बोध केला ।।५१।। नंतर एकाक्षर मंत्र मज देत । गाणपत्य माझा पिता मुदित । त्यास प्रणाम करून परत जात । स्वाश्रमांत मी तेव्हां ।।५२।। गणेशाचें ध्यान करित । तयासी सदैव पूजित । तयाचा जप सदोदित । माझ्या मुखें चालविला ।।५३।। नंतर स्वल्प काळें लाभत । मानसीं मी शान्ति अद्भुत । योगिवंद्य जाहलों जगांत । तथापि गणपा पूजितसें ।।५४।। ऐसें एक संवत्सर जात । गणेश तेव्हां प्रकटत । त्या भक्तवत्सलास मी स्तवित । हृष्टचित्तें पूजून ।।५५।। नंतर मज गाणपत्य करून । पितृतुल्य महोदर स्वानंदधन । स्वानंदलोकीं गेला परतून । ब्रह्मपति प्रभू जगाचा ।।५६।। ऐसें सांगून पूर्व चरित । देवल अश्वसेन नृपाप्रत । गणेशदशाक्षर मंत्र देत । अन्तर्धान नंतर पावला ।।५७।। देवल स्वाश्रमांत जात । अश्वसेन तो मंत्र जपत । राजशार्दूल गणेशभजनांत । भक्तिपूर्वक लीन झाला ।।५८।। तेथ प्रथम श्रावण वरदा येत । चतुर्थी ती परमपुनीत । त्या चतुर्थीचें व्रत । केलें नृपें प्रजेसहित ।।५९।। उपोषण करून दिवसभर । केला गणेशभक्तीचा गौरव उदार । पंचमीस पारणा करी नृपवर । ज्वर त्याचा नष्ट झाला ।।६०।। सर्व दाह शमला । प्रजेत आनंद जाहला । रोगादिहीन जाहला । प्रजाजनही समस्त ।।६१।। तेव्हां तो हें विख्यात । महीपृष्ठीं व्रत करित । शुक्लकृष्ण चतुर्थीचें पुनीत । आरोग्यादी प्राप्त झालें ।।६२।। व्रताच्या पुण्यें प्राप्त । पुत्रपौत्रादी धन समस्त । वृद्धत्वीं राज्य पुत्राप्रत । अर्पून राजा जात वनीं ।।६३।। शांतिपरायण वनांत । सस्त्रीक तो तैं निवसत । गणनायकासी भजत । अन्तीं गेला स्वानंद लोकीं ।।६४।। ब्रह्मभूत झाला नृपती । प्रजाजनांची तीच स्थिती । ऐसी व्रताची या महती । सर्वसिद्धिप्रद हें सदा ।।६५।। ऐसीच असे अन्य कथा ख्यात । गुर्जर देशीं क्षत्रिय वसत । पापकर्मे करी

अत्यंत । अन्तीं दुर्बल तो झाला ।।६६।। बाल्यापासून पाप कर्मांत । दुष्टात्मा तो होता रत । स्त्रीमांसमदिरासक्त । पशूंची जनांची हत्या करी ।।६७।। स्वगुरूस मारून मंदमती । त्याचें द्रव्य हरून जगतीं । पापाची जोडिली संगती । एकदा ताप त्यास आला ।।६८।। क्षत्रियाधम तो ज्वरपीडित । देहाची शुद्ध हरपत । अत्यंत व्याकुल तो होत । उपवास घडला त्या दिनीं ।।६९।। दैवयोगें ती श्रावण वरदा असत । चतुर्थी तै उपोषण घडत । अन्नजल कांहीं न घेत । दुसऱ्या दिवशीं ज्वर उतरला ।।७०।। पंचमी ती तिथी होती । त्या दिनीं उपवासाची समाप्ती । किंचित अन्नभक्षणें अवचिती । घडली त्या पाप्याची ।।७१।। रोगहीन तो होत । पुनरपि परी पाप करित । कालांतरें निधन पावत । गणेशदूत तै आले ।।७२।। त्यांनी त्यास ब्रह्मलोकांत । आदरें नेलें त्वरित । अंतीं तो होत ब्रह्मभूत । ऐसा प्रभाव ह्या व्रताचा ।।७३।। अज्ञानानें व्रत घडलें । तरीही तें तारक झालें । स्वानंदाप्रत गमन झालें । दुष्ट पापी त्या क्षत्रियाचें ।।७४।। तरी ज्ञानी जें व्रत करिती । त्यांची काय वर्णावी महती । ऐसे नाना जन जगतीं । चतुर्थीव्रतें पावन झाले ।।७५।। हें सारें वर्णनातीत । परी तुज कथिलें किंचित । श्रावणचतुर्थी महिमान ऐकत । वाचित अथवा जो नर ।।७६।। तो नर इहलोकीं लाभेल । सर्व सुखें भोग अमल । अन्तीं स्वानंदलोकीं सफल । होईल ह्यांत न संशय ।।७७।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते श्रावण शुक्ल चतुर्थीव्रतकथनं नामाष्टादशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय अठरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ विनवी वसिष्ठासी । चतुर्थी येत जी

मलमासी । त्या वरदेचें चरित्र मजसी । सर्वसिद्धिप्रद सांगावें ।।१।। वसिष्ठ तेव्हां कथन करित । पुरातन इतिहास तयाप्रत । आंध्र प्रांतीं राजा असत । सुषेण नामें धार्मिक ।।२।। चंपक नामक नगरींत । धर्मनीतीनें तो राज्य करित । विविध शस्त्रास्त्रीं पारंगत । दानशूर यशस्वी तो ।।३।। व्रतपरायण तो भक्त । देवविप्र अतिथिपूजेंत रत । भूमंडळ जिंकून राज्य करित । सर्व राजे करभार देती ।।४।। परी त्याच्या राज्यांत । एक भयंकर आपत्ति येत । साप चावती जनांप्रत । क्षुब्ध सर्प सर्वत्र फिरती ।।५।। जेथ जेथ प्रजाजन जाती । तेथ तेथ सर्पही असती । झाली त्यांची अगतिक गती । कोठें रहावें समजेना ।।६।। वनांत अथवा गृहांत । सर्पदंशाचें भय सतत । राजा जाहला दु:खार्त । महाभयपरायण ।।७।। पंचमीचें व्रत करिती । होण्या नागांची शांती । परी नाग न शमती । परम दारुण ते तथापि ।।८।। नाना पुण्यतीर्थयात्रा करिती । प्रजाजन परी न होय मुक्ती । क्रूर नाग ते सर्वत्र विचरती । भूमिवरी दशरथा ।।९।। तेव्हां तो राजेंद्र शरण जात । जैमिनीगुरूस श्रद्धायुक्त । त्यास प्रणाम करून राहत । ओंजळ जोडून त्याच्यापुढें ।।१०।। आसनादी देऊन त्यास तोषवित । आगमन कारण मुनि विचारित । सुषेण तेव्हां नि:श्वास सोडित । सांगे सकल वर्तमान ।।११।। स्वामी सर्प झाले अपार । चावती प्रजेस अनिवार । भयसंकुलित समग्र । राहण्या स्थान ना उरलें ।।१२।। स्वामी नाना उपाय केले । परी ते सारे व्यर्थ ठरले । सर्पाचें भय ना शमलें । म्हणोनि तुजला शरण आलों ।।१३।। सर्पगणांची व्हावी शांति । म्हणोनि काय करावी कृती । हे सारें जरी न सांगाल मजप्रती । तरी मी प्राण त्यागीन येथ ।।१४।। वसिष्ठ कथा पुढे सांगती । जैमिनी तेव्हां नृपास म्हणती । स्वशिष्यासी निंदिती । तो वृत्तान्त ऐक आतां ।।१५।। अरे पाप्या तुझ्या राज्यांत । चतुर्थीचें नष्ट झालें व्रत ।

त्या योगें मरणोत्तर जाल नरकांत । सर्वही तुम्हीं निःसंशय ।।१६।। चार पुरुषार्थांची दायिका । ऐसी चतुर्थी वरदा एका । संकट हरी ती संकष्टी सुखकारिका । ऐसें रहस्य जाणावें ।।१७।। जरी हें चतुर्थीचें व्रत । कार्यारंभी न करित । तरी चार पुरुषार्थहीन होत । ऐसें कर्महीन जाण ।।१८।। ऐसें सांगून महिमान । चतुर्थीचें केलें कथन । तें ऐकून सुषेण प्रसन्न । विचारी प्रश्न उत्सुकतेनें ।।१९।। कैसा हा गणेशान देव असत । ज्याचें हें व्रत अद्भुत । त्याचें स्वरूप मजप्रत । सांगा त्यासी भजेन मी ।।२०।। जैमिनी देई उत्तर । गणेशस्वरूप वर्णनाचे पार । तथापि उपाधियुत स्वरूप सुंदर । ढुंढीचें मी वर्णितों ।।२१।। मीं पूर्वी शांतिलाभार्थ जात । व्यासासी शरण सुविनीत । तेव्हां तो साक्षात् नारायण जें सांगत । तेंचि तुज मी सांगेन ।।२२।। तूं माझा शिष्य परी अधम । म्हणोनि विसरलास व्रत अनुपम । गणेशाचें जें जगीं परम । सर्वसिद्धिप्रदायक ।।२३।। देहदेहिमय सर्व असत । गकाराक्षरें निवेदित । ण'कारवाचक ब्रह्म वर्तत । संयोगायोगरूप ।।२४।। त्यांचा स्वामी गणेश ख्यात । महामते ऐसें वेद सांगत । चित्तांत निवास करी अद्भुत । म्हणोनि चिंतामणि नाव ।।२५।। चित्तरूपा स्वयंबुद्धि असत । भ्रांतिरूपा ती सिद्धि वर्तत । त्यांच्यायोगें प्राप्त होत । त्या उभयतांचा जो पति ।।२६।। ऐसें सांगून नृपास देत । षडक्षर गणेशमंत्र पुनीत । सुषेणासी विधियुक्त । यथान्याय सविशेष ।।२७।। नंतर मुनीची अनुज्ञा घेऊन । सुषेण स्वनगरांत परतून । व्रत करण्या उत्सुक मन । तै प्रथम आला मलमास ।।२८।। मलमासांत वरदाख्य येत । शुक्ल चतुर्थीचें व्रत । तें सुषेण नृप आचरित । भक्तिभावें त्या वेळीं ।।२९।। आपुल्या समस्त प्रजेकडून करवित । राजा हें व्रत अद्भुत । नगरजन ग्रामस्थही करित । विधिपूर्वक सर्वत्र ।।३०।। राजा जें परमादरें करित । प्रजा

तें करी हर्षयुक्त । त्या व्रतपुण्यानें अंतर्हित । सर्प झाले त्या राज्यांत ।।३१।। लोक जाहले सर्पभयमुक्त । तैसेचि रोग वर्जित । पुत्रपौत्रादि संयुक्त । धनधान्य समन्वित ।।३२।। वृद्ध होता स्वपुत्राप्रत । सुषेण आपुलें राज्य देत । वनांत जात स्त्रीसमवेत । विघ्नेशाचें पूजन करी ।।३३।। अन्तीं स्वानंदलोकीं जात । व्रतप्रभावें ब्रह्मभूत । सर्व लोकही व्रतसंस्थित । शुक्ल कृष्ण चतुर्थी करिती ।।३४।। तेही अंतीं क्रमें होत । व्रतप्रभावें ब्रह्मभूत । दुर्लभ कांहींच नुरत । व्रत हें महा अद्भुत करितां ।।३५।। आणखी एक कथा असत । मलमास चतुर्थीच्या संबंधात । शुक्लचतुर्थीचें जें व्रत । पुण्यकारक श्रवणेंही ।।३६।। कोणी एक हस्तिनापुरांत । होता क्षत्रिय भयंकर पापरत । बाल्यापासून दुष्ट आचरित । विविधरीती क्रूर कर्मे ।।३७।। द्रव्यलोभार्थ जनकास मारित । परस्त्रीलालस अत्यंत । चौर्यकर्मीं होता आसक्त । दुर्मती तो पापी नर ।।३८।। एकदा हिंडत होता वनांत । पांथस्थासी ठार मारित । त्यानंतर सर्पदंश त्यास होत । भयोद्विग्न जाहला तै ।।३९।। स्वगृहा परतण्या वांच्छित । परी विषप्रभावें संतप्त । तेथेच जल अन्नरहित । देहपात त्याचा झाला ।।४०।। तो दिवस होता पुनीत । शुक्लपक्ष मलमास चतुर्थीयुक्त । त्या दिवशीं नकळत घडत । उपवासव्रत त्या पाप्यासी ।।४१।। चतुर्थीस उपवास घडत । पंचमीस तो झाला मृत । महाखल तो त्या घोर वनांत । अन्तीं गेला स्वानंदलोकीं ।।४२।। तेथ गणपतीस पाहत । स्वयं झाला ब्रह्मभूत । ऐशाचि परी नाना लोक लाभत । ब्रह्मभूत पदवीसी ।।४३।। येथ अखिल भोग भोगित । अन्तीं ते मुक्त होत । ऐसें हें मलमास चतुर्थीचें अद्भुत । माहात्म्य जो ऐकेल ।।४४।। अथवा जो हे वाचील । त्यास सर्वलाभ होईल । मृत्यूनंतर तो पावेल । शाश्वत गणेशसायुज्य ।।४५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे

चतुर्थे खंडे गजाननचरिते मलमास शुक्ल चतुर्थीमाहात्म्य वर्णनं नाम एकोनविंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकोणिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ म्हणे वसिष्ठांप्रत । वरदामाहात्म्य ऐकलें पुनीत । कृतकृत्यता त्यायोगें वाटत । यांत संशय कांहीं नसे ।।१।। यासम अन्य नसे व्रत । सर्वांसह अत्यंत । धन्य ते पुरुष भक्तियुक्त । चतुर्थीव्रत जे करिती ।।२।। आता संकष्टीचें महिमान । सांगा मज विस्तारें करून । माझी तृप्ति न होय ऐकून । अमृतासम या कथा ।।३।। मुद्गल दक्षासी सांगती । ऐसी प्रार्थना ऐकून ती । वसिष्ठ दशरथास म्हणती । प्रजानाथा ऐक आतां ।।४।। तुझ्या मनीचा भाव जाणून । जाहलों मी प्रसन्न । तूं मज गमसी पुण्यवान । गणेशभक्ती तुझ्या चित्तीं ।।५।। अल्प पुण्य असता न उपजत । गणेश कथेंत भक्ति मनांत । तरी श्रवणानंददायक कथा पुनीत । महाभागा ऐक आतां ।।६।। कृष्णचतुर्थी विषयी वृत्तान्त । सांगेन तुज पुरातन साद्यंत । महापुण्यप्रद जो वाचितां लाभत । श्रवणानेंही महापुण्य ।।७।। सहस्राख्य नाम पुरांत । शूरसेन राजा राज्य करित । सभेमाजीं संगीत । सदैव त्याच्या निनादे ।।८।। एकदा संगीत सभा चालत । तै अकस्मात विमान पडत । जें ज्वलन प्रभायुक्त अत्यंत । तें पाहता चकित सारे ।।९।। विमानाचा वृत्तान्त । जाणून घेण्या दूत पाठवित । तेव्हा जो नगरप्रांतात । नगरजनांसमवेत गेला ।।१०।। दूताकडून वर्तमान । कळता राजा उत्सुक मन । प्रजेसहित तेथ जाऊन । आश्चर्य पाहता जाहला ।।११।। तेथ देवयुक्त इंद्रास पाहत । मनीं जाहला विस्मित । त्यास घाली दंडवत । साष्टांग तेव्हां भूवरी ।।१२।। पुनरपि उठोनि वरती । हात जोडून म्हणे तयाप्रती । शूरसेन

राजा प्रसन्नमती । म्हणे धन्य माझें जीवन ।।१३।। धन्य दान मातापिता । धन्य नगरादिक आतां । कृतकृत्य झाले तत्त्वतां । देवेंद्रा तुझ्या दर्शनानें ।।१४।। देवेंद्रा कोठे जाण्या निर्गमन । केलेंत सांगा घेऊन विमान । परी आता मग हें भूतलीं पडून । विघ्न कैसें ओढवलें ? ।।१५।। कोणत्या पुण्याईनें अज्ञात । परी देवांसह तुझें दर्शन घडत । तरी आता आज्ञा द्यावी सांप्रत । काय करूं मी आपुलें कार्य ।।१६।। देवनायका प्रयत्न करावा । विमान उडविण्या पुनरपि बरवा । कोणत्या पापानें व्हावा । अपघात ऐसा न समजे ।।१७।। ऐसें वचन विनीत ऐकून । इंद्र सांगे राजास तत्क्षण । कैवर्तक नाम महापापी असून । त्यानें विघ्नेश पूजिला ।।१८।। मुद्गलानें त्यास उपदेश केला । नाममंत्राचा भला । सहस्त्रवर्षानंतर तयाला । वर मिळाला आज ।।१९।। ब्राह्मणोत्तम होऊन। भ्रूमध्यातून सोंड फुटून । भ्रुशुंडी नामें ख्यात महान । गणेशभक्त तो जाहला ।।२०।। त्याचे दर्शन घेता नुरत । पुनर्जन्म या जगांत । दर्शनार्थ त्याच्या जाऊन परत । चाललों होतो स्वर्गात ।।२१।। परी येथ तुझ्या राज्यांत । एक कुष्ठरोगी वैश्य असत । त्याची दृष्टी पडता अकस्मात । विमान माझें कोसळलें ।।२२।। त्या वैश्याचे हे दुष्कर्म । त्याचाच हा दुष्परिणाम । आतां संकष्टी कृष्णपक्षगा परम । तिचे पुण्य मज देई ।।२३।। जरी ते पुण्य मिळेल । तरीच विमान हें चालेल । अन्यथा पुरुषार्थ सर्व होईल । विमान उडविण्या असमर्थ ।।२४।। तितुक्यामाजी तेथ येत । विमान दुसरे अकस्मात । गणेशाचा दूत असत । त्यामाजी विराजमान ।।२५।। त्याच नगरांत चांडाळी होती । पापी आंधळी कुष्ठरोगयुत ती । अंगावरी तिच्या फिरती । रोगकृमी अनिवार ।।२६।। पूंरक्तानें माखली होती। सर्वांगास दुर्गंध अती । भिक्षा मागून चालवीत जगतीं । उदरनिर्वाह आपुला ।।२७।। माघमासीं कृष्ण तृतीयेत । रात्र थोडी उरली असत ।

तेव्हां मद्यपान करून निजत । चांडाळीण ती निर्भय ।।२८।। मद्यपान योगें निद्रित । चतुर्थी तिथीस रात्रीं उठत । चंद्रोदय होता अकस्मात । क्षुधा तिला लागली ।।२९।। रात्रीं भिक्षेस जात । दयाळू कोणी तिज अन्न देत । तें ती खाई बुभुक्षित । पंचमीस ती मृत झाली ।।३०।। त्या पापी चांडाळीस घडलें । संकष्टीचें व्रत जें भलें । केवळ अजाणता परी झालें । पुण्यकारक तारक ।।३१।। म्हणोनी तें दुसरें विमान । आलें होतें तत्क्षण । त्या चांडाळणीस बैसवून । स्वानंदलोकीं परतलें ।।३२।। तेव्हां तिच्या अंगावरून । वारा जो वाहला पावन । त्याचा स्पर्श इंद्रविमानास होऊन । विमान उडालें देवेंद्राचें ।।३३।। व्रतकर्त्याच्या शरीरास । वायूचा होता स्पर्श । तो पावन होऊन विमानास। चालना अद्भुत मिळाली ।।३४।। तें पाहून झालें देव विस्मित । मुनिगण समस्त । ज्ञान दृष्टीनें पाहून नृपाप्रत । व्रत तेव्हां ते प्रशंसिती ।।३५।। देवांसह इंद्र परतत । जेव्हां स्वर्गलोकांत । तेव्हा राजा स्वनगरांत जात। आश्चर्य बहु वाटें ।।३६।। मग वसिष्ठास बोलावित । विनयानें प्रणाम करित । तै मीं उपदेशिलें विधियुक्त । यथान्याय अंगारकयुत ।।३७।। माघकृष्ण चतुर्थी व्रत । ते तो श्रद्धेनें आचरित । पंचमीस गणेशासी पूजित। संकष्टीव्रत पूर्ण झालें ।।३८।। तेव्हां एक विमान येत । गणेशदूत त्यांत असत । शूरसेनाच्या नगरांत । नृपाप्रती ते दूत गेले ।।३९।। म्हणती व्रतप्रभावें तूं भक्त । चल आता गणेश्वराप्रत । तुज नेण्यासी आलों त्वरित। तें ऐकून शूरसेन म्हणे ।।४०।। जन्मापासून आजपर्यंत । नगरजनांसह जें भुक्त । शुभाशुभ फळ तें त्वरित । सोडून कैसा येऊं मी? ।।४१।। माझ्या नगरजनांस सोडून । कैसा पाहूं गजानन । माझ्यावरी त्यांची भक्ति महान । म्हणोनि ऐसें सांगतों ।।४२।। तेव्हां गणराजाचे दूत । म्हणती त्या शूरसेनाप्रत । घेऊनी नगरजनां समस्त । विघ्ननायकाकडे

चलावें ।।४३।। यथा विधि व्रताचा हा प्रभाव । यथाशास्त्र व्रताचा महिमा अभिनव । म्हणोनि विश्वाचा उभार सर्व । पुण्याईनें ह्या होतो ।।४४।। तेव्हां राजा अति हर्षित । चतुर्वर्णजनांसहित। आरूढला त्या विमानांत । गणेशदूत विमान चालविती ।।४५।। परी ते विमान न हाले । तेव्हां गणेशदूत ध्यानयुक्त झालें । दिव्य दृष्टीनें त्यांना दिसलें । कारण त्या विघ्नाचें ।।४६।। त्या नगरजनांत । होता तो कुष्ठी वैश्य पापयुक्त । दृष्टिपातें इंद्र विमानाप्रत । संकट ज्याच्या ओढवलें ।।४७।। त्या गणेशदूतां प्रणाम करून । राजेंद्र बोले तैं वचन । कोणतें पाप केलें महान । यानें त्यास काय प्रायश्चित? ।।४८।। ते मी प्रायश्चित करीन । परी यास सह नेईन। तेव्हां गणनाथदूत कथन । करिती त्याचें पूर्ववृत्त ।।४९।। राजा हा वैश्य पूर्वजन्मांत । होता वाडव बुधनामा पापयुक्त । याची माता पतिव्रता अत्यंत। शाकिनी नामें प्रसिद्ध ।।५०।। याचा पिता दूर्व नाम असत । तपस्वी वेद पारंगत । या बुधाची पत्नी पुनीत । पतिव्रता सावित्री ।।५१।। यानें यौवनांत त्यागिली । आपुली पत्नी चांगली । परस्त्रीची लालसा धरली । विषयलंपटही तो झाला ।।५२।। एकदां गौडपुरींत। एक वेश्या पाहिली रूपयुक्त । तिज पाहून विस्मित । अत्यंत तो जाहला ।।५३।। तिचा संग निरंतर । देऊन करी धन अपार । घरातलें पात्रभूषण समग्र । तिजसाठीं खर्चिलें ।।५४।। तदनंतर परगृहांत । चोरी करी अविरत । मद्य पिऊन रमत । सदैव त्या वेश्येसह ।।५५।। एके दिवशीं बुध पापी न परतत । आपुल्या गृहासी तै चिन्तित । त्याचा पिता दूर्व करित । शोध त्याचा मुनिसत्तम ।।५६।। परी कोणी जन न सांगत । त्याचा ठाव तयाप्रत । त्या दुर्विनीत पुत्राचें चरित । क्रोध भीतियुक्त ते ।।५७।। घरोघरीं पिता तो शोधित । परी जेव्हां पुत्र न मिळत । तेव्हां रात्रीं स्वगृहीं परतत । विचारी आपुल्या वनितेसी ।।५८।। ती

म्हणे स्वामी सुत । ना आला अद्यापि गृहाप्रत । एकमेव पुत्र त्यांचा असत । त्याच्या स्नेहें विद्ध झाला ।।५९।। रात्रीं पुनरपि शोध करित। मार्गस्थ लोकां विचारित । पाहिला का माझा सुत । बुध कोणी सांगाहो ।।६०।। ऐसें नाना जनां विचारित । परी कोणी कांही न सांगत । अन्तीं भीम नाम अंत्यज भेटत । त्यानें सत्य कथियेलें ।।६१।। तपस्व्या मुनिसत्तमा । काय सांगू मी तुज तपोधामा । तुझा पुत्र बुधनामा । वेश्यागृहीं राहतो ।।६२।। तो मद्यपि जातिदूषण । काय विचारिसी त्याची खूण । त्याचें वर्तन अति दारुण । नीतिबाह्य सर्वथा ।।६३।। ऐकून ही वार्ता अवचित । मुनिपुंगव झाला विस्मित । गेला स्वत: त्या वेश्यागृहांत । स्वपुत्रास तेथ पाहे ।।६४।। त्यास मदोन्मत्त पाहून । पिता म्हणे हें काय अघटित । मद्यपी तूं वेश्यासक्त । दूषण आमुच्या कुळासी ।।६५।। पुन्नाम नरकापासुन । जो वाचवी तो पुत्र महान । तूं नरकप्रद नादान । माझा पुत्र कां झालास? ।।६६।। आतां हा देह सोड । करी यममंदिराची जोड । ऐसें पित्याचें वचन तो जड । ऐकता क्रुद्ध जाहला ।।६७।। पित्यास लाथेनें अनिवार । मारिलें त्यानें फार । मर्मस्थानीं लागतां मार । वृद्ध पिता तो निवर्तला ।।६८।। त्या मृत पित्याचें शरीर। फेकुनि दिधलें वेश्यागृहाबाहेर । दुसऱ्या दिवशीं प्रभाती सत्वर । बुध गेला तो स्वगृहासी ।।६९।। पुत्र परतला हें पाहुन । जननी विचारी स्नेहयुक्त मन । बाळा कोठें होतास रे खिन्न । तुजविण माझें जीवन ।।७०।। आतां आलास परतून । माझ्या चित्तास समाधान । तुझा शोध करण्या उन्मन । पिता तुझा बाहेर गेला ।।७१।। तो अद्यापि न परतला। त्याचा शोध करी पहिला । नंतर येई स्नान करण्याला । बाळा जाई सत्वर ।।७२।। मातेचें वचन ऐकून । पुत्र न बोले सत्य जाणून । ती सांगे पुन: पुन्हा विनवून । तेव्हां संतापला तो पापी ।।७३।। मातेच्या

मस्तकावर प्रहार । करी तो निर्दय क्रूर । तेव्हां मस्तक फुटून सत्वर। माताही मृत्यु पावली ।।७४।। तिचें प्रेत बाहेर फेकित । नंतर पुनरपि वेश्येकडे जात । अंतरीं परम हर्षित । मातापित्यांच्या निधनानें ।।७५।। ग्रामजन प्रेतें पाहती । ते ब्राह्मण ब्राह्मणीचें मग दहन करिती । जाणुनी दूर्वमूनीची महती । राजानें पुत्रास न दंडिले ।।७६।। दुसरे दिनीं तो पापी परतत । बुध नामा स्वगृहांत । त्याची धर्मपत्नी सावित्री म्हणत। स्वामी हें काय घोर केलें? ।।७७।। वधिलें आपण जनक जननीस। मज सोडूनी रत वेश्येस । मी धर्मप्रिय सुंदरी सविशेष । तरी कां जाता वेश्येकडे? ।।७८।। चार योनींत नरदेह सुदुर्लभ । त्यातहीं ब्राह्मण परम दुर्लभ । ज्ञानकर्मादिसंयुक्ताचा लाभ । परम पुण्यें होत असे ।।७९।। परी नाथा आपण अघटित । कुकर्म केलें अत्यंत । आपुल्या संगें कोणती गत । माझीही होईल तें न कळें ।।८०।। ऐसें ऐकतां पत्नीचें वचन। दुष्टात्मा तो संतापून । हातांतली काठी मार मारून। जर्जर करी स्वपत्नीसी ।।८१।। सावित्री त्या योगें क्षीण होत । स्वर्गवासी झाली त्वरित । ऐशापरी पत्नीवधाचें लागत । पातक त्या दुष्टासी ।।८२।। नंतर कांहीं काल जात । तेव्हां एकदां बुध प्रवेशत । आपुल्या गुरूच्या घरांत । गुरुपत्नी होती एकाकिनी ।।८३।। तिला पाहून तो दुर्मती । जाहला काम विह्वल चित्तीं । तिज पकडून भोगी दुर्मती । ऐशीं दारुण पापें केलीं ।।८४।। नंतर तो मरण पावत । तेव्हां जात नरकांत । नानाविध दु:खें भोगित । यमपुरींत तो पापी ।।८५।। तदनंतर हा वैश्य कुळांत । कुष्ठ समन्वित पीडा भोगित । अद्यापि पापाचरण करित । दारुण नानाविध हा नीच ।।८६।। द्रव्यलोभें जात वनांत । द्विजादींचें हनन करित । सतीस दूषवी सतत । वनांत एकाकिनी भेटतां ।।८७।। शूरसेना म्हणोन यास वगळून । चलावें गजानन लोकीं प्रसन्न । याचा स्पर्श होतां

तत्क्षण । सचैल स्नान करावें ।।८८।। दूतांचें वचन ऐकून । अनुकंपा नृपास वाटून । त्यांस करूनिया वंदन । म्हणे यानें बहु पाप केलें ।।८९।। ह्याच्या पापांची गणना नसत । प्रायश्चित्तही त्यास नसत । तरी मीं काय करावें सांप्रत । गणांनो तें मज सांगा ।।९०।। सर्व पापांचें प्रायश्चित्त । असेल जरी महाअद्भुत । तरी तें कृपा करून मजप्रत । सांगा आपण स्नेहवश ।।९१।। तें मी करीन मरणपर्यंत । तें ऐकून गाणपत्य सांगत । अंतरीं तै हर्षभरित । 'गजानन' हा जप करी ।।९२।। 'गजानन' नावाचा जप ह्यास । ऐकवितां सतत विशेष । चार वेदांचें सार असत। ब्रह्ममुखांतून हें उमटलें ।।९३।। सतत गजानन नांव ऐकत । वैश्य जाहला पापविमुक्त । कुष्ठहीन तेजस्वी अत्यंत । सुवर्णासम कांति झाली ।।९४।। गजानन नामाचा प्रभाव अनंत । वैश्याचे शरीर तेज:पुंज होत । रोगमुक्त होवून स्वास्थ्ययुक्त । श्रद्धा गजानन नामीं दृढ झाली ।।९५।। तो वैश्य हर्षभरित । समस्त जन तैं आनंदित । त्या सर्वांसमवेत। विमानीं नृप बैसला ।।९६।। स्वानंदलोकीं विमान जात । तेथ गणपास पाहत । ते सर्वही ब्रह्मभूत । जाहले थोर गाणपत्य ।।९७।। ऐशापरी ब्रह्मभूत । राजेंद्र तो पुण्ययुक्त । काय वर्णू मी वृत्तान्त । प्रभाव अवर्णनीय ह्या व्रताचा ।।९८।। चतुर्विध हें जगांत । संकष्ट ऐसें संमत। तें सोडून ब्रह्मभूत । व्रत पुण्यानें नर होई ।।९९।। ऐसें हे माघचतुर्थीचें महिमान । संकष्टीचें ऐकतां प्रसन्न । वाचितां वा ऐकतां जन । सर्वार्थ लाभून मुक्त होती ।।१००।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते माघ कृष्ण चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम विंशोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय विसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ झाला मुदित । ऐकुनी माघ संकष्टीचें व्रत । म्हणे फाल्गुन संकष्टीचा वृत्तान्त । वसिष्ठा मजसी सांगावा ।।१।। तेव्हां वसिष्ठ वृत्तान्त सांगत । पौलस्त्य रावण प्रख्यात । तप सुदारुण तो करित । वर सुयोग्य लाभला ।।२।। त्रिलोकीचें राज्य करित । महाबळ तो प्रभावयुत । प्रधानांवरी राज्य सोंपवित । एकदा तो राक्षसश्रेष्ठ ।।३।। निर्जन स्थळी एकांतांत । जाऊन राहिला ध्यानस्थित । वेदोपनिषदांत जें उक्त । तें ब्रह्म ध्यातसे ज्ञानयोगें ।।४।। ऐसा बहुत काळ जात । परी उत्तम ज्ञान न लाभत । तेव्हां जाहला खेदयुक्त । शंकराचें स्मरण करी ।।५।। शंकरें नारद मुनीस पाठविलें । राक्षसानें त्याचे पाय धरलें । भक्तिभावें हात जोडले । प्रश्न तयासी विचारी ।।६।। स्वामी योगिश्रेष्ठा ज्ञानप्रद । काही साधन करा विशद । ध्याननिष्ठ मी कष्टप्रद । प्रयत्न अविरत करीतसें ।।७।। परी तें महान ज्ञान । मजसी महामुने न लाभून । मन झालें माझें उन्मन । आता उपाय सांगावा ।।८।। नारद तेव्हां त्यास म्हणत । शिवें पाठवलें मजला तुजप्रत । राक्षसोत्तमा ज्ञानप्रद वाक्य पुनीत । ऐक आतां उत्तम ।।९।। चतुर्विध जगद्ब्रह्म संमत । संकष्ट ऐसें जगांत । त्याच्या नाशार्थ असे व्रत । संकष्टी नामक तें करी तूं ।।१०।। ऐसें सांगून चतुर्थीची महती । नारदें कथिली तयाप्रती । ती ऐकून हर्ष चित्तीं । रावणाच्या दाटला ।।११।। रावण म्हणे सांगा मजप्रत । गणाधीश हा कोण असत । त्याचें ज्ञान तैसें व्रत समस्त । चार पदार्थप्रद सांगा ।।१२।। जे व्रत न करितां होत । चार पदार्थांचा नाश निश्चित । सर्व कार्यारंभीं ख्यात । सर्व सिद्धिप्रदायक जें ।।१३।। ऐसें ऐकून विनीत वचन । नारद त्यास म्हणे तोषून । रावणा गणेशाचें ज्ञान महान । वर्णन करण्या अशक्य प्राय ।।१४।। परी उपाधि युक्त तें वर्णन करीन । गण समूहरूप असून।

समूह ब्रह्मवाचक प्राचीन । बाह्यांतरादि योगें जन्मे ।।१५।। देहदेहिमय ब्रह्म असत । गकाराक्षर वाचक ख्यात । संयोगें अयोगरूप वर्तत । 'ण'कार अक्षर जगीं ।।१६।। त्यांच्या योगें गणेश संमत । स्वामी सर्वत्र विश्वांत । त्यास सर्वभावें भजता तुजप्रत । शांति लाभ होईल ।।१७।। ऐसे बोलून गणेशाचा मंत्र देत । दशाक्षरी तै रावणाप्रत । महायोगी तो विधियुक्त । त्यावेळीं सूचना त्यास करी ।।१८।। जेव्हां तूं हा मंत्र त्यागशील । तेव्हां बुद्धिभ्रंश तुझा होईल । म्हणोनि गणेश मंत्र हा विमल । न त्याज्य सदा रक्षावा ।।१९।। ऐसें सांगून अन्तर्धान । पावला नारद मुनी महान । तदनंतर फाल्गुनी संकष्टी महान । आली प्रथम कालक्रमें ।।२०।। रावणें त्या दिनीं हर्षयुक्त । आचरिलें विधियुक्त संकष्टीव्रत । व्रतपुण्याच्या प्रभावें लाभत । स्फूर्ती त्यासी तत्क्षणीं ।।२१।। त्या दिनापासून अविरत । शुक्ल कृष्ण चतुर्थीचें व्रत । राक्षसाधिप आचरत । प्रजाजनांसही बोध करी ।।२२।। त्यायोगें ज्ञान लाभत । रावण जें मनी वांच्छित । तदनंतर स्वनगरींत । राज्य करी तो मदोन्मत्त ।।२३।। दुष्ट संगतियोगें ज्ञान उत्तम । नष्ट झालें त्याचें सुकर्म । स्त्रीमांसादिकांत परम । रुचि जडली तयाची ।।२४।। मी गणेशरूप असत । मज सम अन्य कोणी न जगांत । पापपुण्य भोक्तृत्व नसत । पूजन कोणाचें करावें म्हणे ।।२५।। नंतर ज्ञानमदें त्यागित । सुखप्रद मंत्र तो गणेशव्रत । पुण्यपावन पूजा सोडित । तेणें ज्ञान नष्ट झालें ।।२६।। द्विज असून राक्षस झाला । धर्मलोपीं रति त्याला । कर्मखंडन करिता जाहला । ऐशा बहु दोषें युक्त तो ।।२७।। त्या दोषप्रभावें मारित । राम त्या रावणासी क्षणांत । राक्षस स्वजन पुत्रासहित । विनाश झाला रावणाचा ।।२८।। दशरथ विचारी वसिष्ठाप्रत । मी यातलें रहस्य न जाणत । तेव्हा वसिष्ठ त्यास सांगत । भ्रमनाशक तें ज्ञान ।।२९।।

प्रत्येक कल्पांत राम जन्मत । दशरथा तुझा होऊन सुत । रावणवीरास तों मारित । गाणपत्य बलान्वित ।।३०।। आणखी एक चरित्र अभिनव। फाल्गुन संकष्टी व्रतोद्भव । सर्व पापहर पूर्ण अपूर्व । भुक्तिमुक्ति प्रदायक ।।३१।। महाराष्ट्रांत द्विज असत । एक पापकर्मा अत्यंत । ब्राह्मणत्व त्यागून तो रमत । चांडाळीसह मोहानें ।।३२।। चांडाळीशीं संबंध ठेवित। पुत्रपुत्री तिच्यापासून होत । ती दोघें मंदधी सदैव असत। मद्यमांसपरायण ।।३३।। एकदा तो वनांत जात । द्रव्यलोभे जनांस मारित । महापापी परस्त्री लालसा युत । फाल्गुन चतुर्थी तै होती ।।३४।। कृष्ण पक्षातील चतुर्थी वर्तत । तेव्हां तो ब्राह्मण पर्वतद्रोणींत। असतां कोणी नृप येत। चतुरंग सेना घेऊन ।।३५।। त्याच्या भयें पर्वतगुहेंत । तो अधम ब्राह्मण त्यादिनीं वनांत । अन्नजळाविण राहात। ऐशापरी व्रत घडलें ।।३६।। त्या राजाचें सैन्य महान । आक्रमणानें करी निर्गमन । दिवसाचा अल्प भाग असता वन । संपूर्ण निर्भय जाहलें ।।३७।। तेव्हां तो भयवर्जित। बाहेर पडून स्वगृहीं जात । त्या समयीं चंद्र उगवत । क्षुधातुर दुष्ट तो झाला ।।३८।। स्वपुत्रांसह अन्न भक्षित। रात्रीं आपुल्या सदनीं निश्चित। साप चावूनी तो मरत । दुर्मती ब्राह्मण तदनंतर ।।३९।। गणेशदूत त्यास नेती । स्वानंदक पुरीं अति प्रीती । विघ्नेश्वरा पाहून मुक्ति । ब्रह्मभूतरूपा त्या मिळाली ।।४०।। न कळतां घडलें व्रत । विधिहीन परी लाभे फळ अद्भुत । पापी अधम मुक्त होत। ज्ञानी जनांची काय कथा ।।४१।। ऐसे अनेक महाभाग झाले । व्रतपुण्यप्रभावें मुक्त भले । ब्रह्मभूतत्व ते पावले । ऐशा कथा असंख्य ।।४२।। जरी अयुत वर्षे सांगेन । तरी ना संपेल हें चरित्र महान । माहात्म्य संक्षेपें कथिलें म्हणून । नृपा मीं तुज अल्पसें ।।४३।। हें फाल्गुन चतुर्थीचें व्रत । कृष्णपक्षीं जो आचरत । ह्या व्रताचें माहात्म्य वाचित । ऐकेल

त्यास सर्व लाभ ।।४४।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते फाल्गुन कृष्ण चतुर्थीचरितवर्णनं नाम एकविंशतितमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकविसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ विनवी वसिष्ठाप्रत । आतां चैत्र कृष्ण चतुर्थीचें व्रत । माहात्म्यासह सांगावें मजप्रत । गणेशकथांत अवीट गोडी ।।१।। वसिष्ठ सांगती पुरातन । इतिहास त्यासंबंधीं महान । कलिंग देशांत उग्रसेन । राजा कोणी धर्मतत्पर ।।२।। तो यज्ञ याग करी सतत । दानधर्महीं देई अविरत । धर्मात्मा तो शस्त्रास्त्र कुशल असत । धीमंत सत्यवाक् नीतियुक्त ।।३।। अन्य नृपांस जिंकून । राज्य करी तो महान । ऐसे होतें सुखमय जीवन । परी अकस्मात् संकट आलें ।।४।। त्या उग्रसेनाच्या राज्यांत । वाघ पिसाळले अत्यंत । ते प्रजाननां भक्षित । नृप यत्नपर व्याघ्रवधीं ।।५।। परी व्याघ्रांचे ना शमन होत । लोक सारे संपीडित । राजासी ते दूषण लावित । पापकर्मा हा राजा ।।६।। जेव्हां राजा धर्मयुक्त । तेव्हां प्रजेस लाभे सुख सतत । दुष्ट राजा होतां जगांत । प्रजेनें काय करावें? ।।७।। दूतमुखांतून ऐकत । प्रजेचें हे मर्मभेदी मत । तेव्हां प्रधानावरी टाकित । राज्यभार उग्रसेन ।।८।। स्वतः वनांत जाऊन एकांतांत । उत्तम तप तो आचरत । सूर्यास सौर गाऊन ध्यात । निराहार राहून तो ।।९।। ऐसे एक वर्ष जात । अस्थिपंजर राजा उरत । तथापि तप न सोडित । ब्राह्मणरूपें तैं सूर्य आला ।।१०।। राजा करी तयाचें स्वागत । पूजा करून यथोचित । फळें नैवेद्यार्थ अर्पित । तेणें तोषला तो ब्राह्मण ।।११।। म्हणे राजसत्तमा तप करिसी । कां आपुला देह पीडिसी । उग्रसेन विनीतभावें तयासी । निःश्वास सोडून दुःख सांगे

।।१२।। नीतियुक्त मी राज्य करित । परी माझ्या राज्यांत । क्रूर व्याघ्रगण प्रजेस भक्षित । उपाय थकले सर्वही ।।१३।। अन्तीं त्यांचें व्हावें शमन । म्हणोनि करी हें तप महान । ऐसें त्याचें वचन ऐकून। विप्ररूप रवि म्हणे त्यासी ।।१४।। अरे नृपा तूं महापापी अससी । चतुर्थीचें व्रत न करिसी । सर्वप्रथम करील तयासी । लाभते सर्व इच्छित फळ ।।१५।। चतु:पदार्थांचें साधन । ऐसें हें व्रत महान । तुझ्या राज्यांत व्याघ्रपीडा दारुण । त्या व्रताच्या अभावें ।।१६।। ऐसी निर्भत्सना करून। चतुर्थी माहात्म्य कथून । त्या नृपासी बोधप्रद वचन । त्या विप्रानें कथियलें ।।१७।। तो बोध ऐकून विस्मित । प्रणाम करून राजा विनवित। काय आश्चर्य तूं साक्षात् । रवि आलास मज भेटाया ।।१८।। धन्य झालों मी दर्शन घेऊन । आतां सांगावें करुणामनें प्रसन्न । गणेशाचें स्वरूप पावन । जें भजेन मी विशेषें ।।१९।। तेव्हां विप्ररूप सूर्य सांगत। गणेशाचें स्वरूप पुनीत । भुक्तिमुक्तिप्रद तयाप्रत । जें चित्तीं आठवावें ऐसें ।।२०।। पंच चित्तांचा प्रचालक । चिंतामणि चित्ती सुखदायक । पंचवृत्ति निरोधें उपासक । प्राप्त करी त्यास योगसेवेनें ।।२१।। असंप्रज्ञांत संस्थ वर्तत । महामते गजशब्द पुनीत । तेंच ज्याचें मस्तक असत । देह सर्वात्मक झाला ।।२२।। भ्रांतिरूपा महामाया संश्रित । सिद्धि वामांगीं विलसत । भ्रांतिधारक बुद्धि प्रकटत । दक्षिणांगीं जयाच्या ।।२३।। त्या सिद्धिबुद्धींचा स्वामी खेळत । हा गणेश मायायुक्त । त्यास विधानें भज तूं सतत । तरीच कल्याण तुज लाभेल ।।२४।। ऐसें बोलून तयास देत । दशाक्षर गणेशमंत्र विधियुक्त । तदनंतर अन्तर्धान पावत। सूर्य जो आला विप्ररूपें ।।२५।। राजा स्वनगरांत परतत । प्रधान करिती त्याचें स्वागत । तयांसी तो सर्व वृत्तान्त । सांगे नृप सुखकारक ।।२६।। चैत्रकृष्णा चतुर्थी येत । तदनंतर ती आचरित । विधानपूर्वक

श्रद्धायुक्त । गणेश भक्तिपूर्वक तो ।।२७।। नगरांत तैसे ग्रामांत । सर्व प्रजाजन संकष्टी करित । तेव्हांपासून प्रख्यात । जाहलें हें व्रत तेथें ।।२८।। कोणी जन भयानें करिती । कोणी श्रद्धापूर्वक आचरती । परी त्याची फलश्रुति । व्याघ्रनाशांत जाहली ।।२९।। महाउग्र ते वाघ समस्त । अंतर्धान पावले त्वरित । रोगादींतून विनिर्मुक्त । सर्व प्रजा सुखावली ।।३०।। राजा उग्रसेन सतत । गणपतीस तेव्हापासून भजत । गुरूरूपें भानूस पूजित । ऐसी गेली संवत्सरें ।।३१।। तदनंतर राज्यभार सुतावर । टाकून निवृत्त झाला नृपवर । गणेशाच्या भजनीं समग्र । समय लावी तेधवां ।।३२।। अन्तीं स्वानंदलोकांत । जाऊन जाहला विमुक्त । त्याचे प्रजाजनही समस्त । क्रमें मुक्त होऊन गेले ।।३३।। ऐसें व्रताचें महिमान । अल्पांशें कथिलें जाण । आणखी एक वृतान्त पावन । ऐक आतां महाभागा ।।३४।। द्राविड देशीं भिल्ल वसत । क्षत्रिय संस्कारहीन अत्यंत । द्रव्यलोभी तो वनांत । पांथस्थांसी लुटित असे ।।३५।। एकदा तो दुरात्मा पाहत । कोणी नर धनवंत वनांत। त्याचा पाठलाग तो करित । शस्त्र हातीं उगारून ।।३६।। तेव्हां तो नर भयत्रस्त । प्राणभयें द्रुतवेगें पळत । त्यामाजीं एक अस्वल येत । बलयुक्त त्यांच्या मध्यांत ।।३७।। त्याने रोधिलें त्या पाप्यास । तेव्हां फेकुनिया शस्त्रास । तो दुरात्मा करी विद्ध त्यास । पाडवी ऋक्षासी भूतलीं ।। ३८।। परी त्या अस्वलानें नखें लावून । भिल्लास पीडिलें दारुण । तोही वनांत पडला दमून । अति दारुण विलाप करी ।।३९।। दैवयोगें चैत्रसंकष्टी होती । त्या दिवशीं तो दुर्मती । जलान्नहीन राहून अन्तीं । चंद्रोदयीं सावध झाला ।। ४०।। तेव्हां तो पापी क्षुधाक्रान्त । समीप कांहीं फळें पाहत । तीं खाऊन शमवीत । क्षुधा आपुली आनंदें ।।४१।। ऐसा तो दिन उलटत । पंचमी तिथी उजाडत । त्या समयीं

तो जाहला मृत । ऋक्षपीडेनें सुदारुण ।। ४२।। मृत्यूनंतर ब्रह्मभूत । तो पापी झाला निश्चित । अजाणता त्यास घडत । जरी हें व्रत संकष्टीचें ।। ४३।। ऐशापरी नाना जन । व्रतप्रभावें मुक्त होऊन । इहलोकीं भोग भोगून । अंतीं ब्रह्मपद लाभले ।। ४४।। दहा सहस्र वर्षें वर्णन केलें । तरी माहात्म्य वर्णन ना पुरें झालें । ऐसें हें व्रत भलें । सर्वार्थप्रद सर्वकाळ ।। ४५।। अजाणता करिती व्रत । तरीही जर फल लाभत । तरी जाणून जे व्रत आचरत । त्यांचे भाग्य किती वर्णावें ।। ४६।। ऐसें हें चैत्रसंकष्टी महिमान । वाचील किंवा ऐकेल जो प्रसन्न । भक्तिभावें तया पावन । अभीप्सित सर्व प्राप्त होय ।। ४७।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खण्डे गजाननचरिते चैत्र कृष्ण चतुर्थीचरितवर्णनं नाम द्वाविंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय बावीसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ वसिष्ठास विनवीत । वैशाख कृष्ण चतुर्थीचें व्रत । आता सांगावें मजप्रत । हे मुनिशार्दूला अतृप्त मी ।।१।। वसिष्ठ तेव्हां महिमा सांगत । अगस्त्य मुनींचा वृतान्त । समुद्रशोषणीं होता रत । परी तें त्यासी जमेना ।।२।। तेव्हां महातेजस्वी तो जात । ब्रह्मदेवासी शरण विनीत । ब्रह्मा तयासी सांगत । वैशाखी संकष्टीचें व्रत ।।३।। तेव्हां तो हें व्रत करित । विधिपूर्वक श्रद्धायुक्त । सर्व मुनिसत्तमांसमवेत । नित्य मंत्र परायण ।।४।। दशरथ विचारी वसिष्ठाप्रत । अगस्त्यास कैसी विस्मृति होत । कैसा तो जाहला व्रतहीन कुंठित । महाद्युती तें सांगा ।। ५।। वसिष्ठ म्हणे नृपा प्रश्न । विचारलास तूं विचक्षण । आता वृत्त सांगतों भावपूर्ण । संक्षेपानें तें तुज ।। ६।।

अगस्त्य एकदा तप करित । अति दारुण निश्चययुक्त । त्याच्या सम कोणी न जगांत । राजेंद्रा ब्राह्मण तपस्व्यांत ।। ७।। परी अज्ञानानें हें व्रत । त्यानें न केले पुनीत । त्याचें कारण तुजप्रत । सांगतो संशय दूर कराया ।। ८।। वेदशास्त्र पुराणांत । कर्में नानाविध असत । तीं सर्व करण्या असत । शक्ति कोणा मानवाची ।। ९।। स्वेच्छेनें कर्मांचा कर्ता होत । मानव या जगतांत । त्यांत एक सुगम मार्ग तुजप्रत । सांगतो दे अवधान ।।१०।। नित्य तैसें नैमित्तिक । द्विविध कर्म असे शास्त्रसंमत । अगस्त्य त्यांतले आचरित । नित्य कर्म महीपते ।।११।। अन्य व्रतादिक समस्त । त्यागून तो विधि समन्वित । तपास देई महत्त्व अत्यंत । त्याहून श्रेष्ठ अन्य न मानी ।।१२।। तपोधन तो त्या गर्वांत । हें संकष्टीचें व्रत न करित । सांगतों रहस्य तुजप्रत । ऐक सारें मनोभावें ।।१३।। गणेशभजन मुख्य असत । यांत संशय काहीं नसत । सर्वसिद्धिकर ते ख्यात । वेदादींतही वर्णिलें असे ।।१४।। राजशार्दूला तथापि जन । संस्कारहीन होऊन । न भजती ब्रह्मनायका महान । गणेशासी अज्ञानानें ।।१५।। तपानें पापें जळती । पुण्याची होय उत्पत्ती । त्या पुण्यप्रभावें गणेशभक्ति । उपजते चित्तीं उपासकाच्या ।।१६।। म्हणून तप:प्रभावे युक्त । अगस्त्य हा श्रेष्ठ तेजस्व्यांत । जाहला पात्र ज्ञानाप्रत । गणेशाच्या तपोयोगें ।। १७।। होऊन क्रोधसंतप्त । वातापिरक्षका सागरा त्वरित । शोषविण्या तो यत्न करित । परी असफल तैं जाहला ।।१८।। तेव्हां होऊन मुनीं विस्मित । ब्रह्मदेवाजवळीं जात । तयाला म्हणे सांगा मजप्रत । आश्चर्य हें काय घडलें ।।१९।। तपें जलधि शोषण्या शक्त । परी आज माझी शक्ति कुंठित । का जाहलीं तें न समजत । आपण सांगावे कारण ।।२०।। ब्रह्मदेव तेव्हां बोले वचन । ऐक महाभागा कारण । नित्य कर्मपर होऊन । सदा तप तूं आचरलास ।।२१।। गणेशाचें

भजन तैसें पूजन । नित्य करिशी तूं महान । परी नैमित्तिक व्रत पावन । चतुर्थीचें विसरलास ।।२२।। तूं तें संकष्टीचें व्रत । त्यागिलेस म्हणोनि असफल होत । सर्व तुझें मनोवांच्छित । आतां करी तें व्रत मुख्य ।।२३।। चार पुरुषार्थांचें दायक । शास्त्रसंमत पावक । तें ना करितां कुंठित साशंक । मति होय मानवाची ।।२४।। जरी हें वैशाख संकष्टीचें व्रत । करशील तूं श्रद्धायुक्त । तरी संकट टळून जगतांत । पूर्णयोगी होशील ।।२५।। गाणपत्यपद पावशील । ऐसें ऐकून वचन अमल । अगस्त्य करी व्रत निर्मळ । गणेश्वराचें हें सदा ।।२६।। त्यायोगें पुरुषार्थयुक्त । होऊन समुद्रा शोषवित । व्रतपुण्याचा प्रभाव अद्भुत । ऐसा प्रथम तैं अनुभविला ।।२७।। तेव्हांपासून अचल भक्ति । गणनाथाची करी स्वचित्ती । मुनींद्रासही व्रतमहती । सांगितली तयानें ।।२८।। नित्य व्रतात मुख्य हें व्रत । सर्वार्थसिद्धिप्रद असत । अन्यही एक वृत्तान्त । सांगतों तुज पुण्यप्रद ।।२९ ।। अवंती नगरींत वैश्य राहत । पापी दुराचारी अत्यंत । बाल्यापासून तो आचरत । महा अद्भुत पापें सदा ।।३०।। तो मातेचा वध करित । द्रव्यलोभें पित्यास मारित । गुरूचाही द्रोह करित। ब्रह्म हत्या त्यास घडली ।।३१।। तेव्हां लोक नृपाप्रती । सांगती सर्व त्याची कृती । तेव्हां तत्क्षणीं त्यास करिती । हद्दपार राज्याधिकारी ।। ३२।। तेव्हां तो गेला वनांत । राहू लागला गुहेंत । मार्गस्थ लोकांसि मारित । नानाविध जीवां ठार करी ।।३३।। नंतर बहु संपन्न होत । दुसरे चोर त्याचा आश्रय घेत । त्यांच्या साहाय्यें बांधित । दुर्गम एक दुर्ग तो ।।३४।। पर्वताच्या गुहेंत । महाखळ तो घर बांधित । चोर तेथ झोपण्यास येत । अन्यथा फिरती जे जगीं ।।३५।। त्यांचा राजा तो होत । भार्येस आपुल्या आणित । पुत्रपुत्री समन्वित । यथेच्छ भोग भोगितसे ।।३६।। चौर्यपरायण चोरांसमवेत । तो दुर्मति कदापि न

करित । लेश मात्रही पुण्य जगांत । मतिभ्रष्ट तो जाहला ।।३७।। पाहतां परस्त्री मार्गांत । तो तिजला भ्रष्ट करित । कांहीं स्त्रिया मरण पावत । शीलभंगाच्या भीतीनें ।।३८।। अवंतीपालका लोक निवेदित । त्या चोरांची हकीगत । तेव्हां मार्ग रोधून उद्यत । चोरमुख्यासी मारावया ।।३९।। दाही दिशांत राजा पाठवित । आपुले सैनिक त्वरित । त्या दुष्टासी ते रोखित । अंतीं पकडला तयासी ।।४०।। अन्य चोरांसमवेत । सर्वांसी ते पकडून नेत । राजास सारा वृत्तान्त । कथन करिती त्या दुष्टाचा ।।४१।। राजानें अन्य चोरांस मारिले । परी त्या वैश्या बंधनीं टाकिलें । राजपुरुष नित्य ताडिते झाले । दुष्टासी त्या अतिभयंकर ।।४२।। पुढे वैशाखी संकष्टी येत । कृष्ण पक्षांतली पुनीत । त्या दिवशी तुरुंगांत । वैश्या त्या खावया न मिळाले ।।४३।। नित्य मार खाऊनी जर्जर । झाला अत्यंत क्षुधातुर । तो पापी दिवस समग्र । उपवास घडून विह्वळला ।।४४।। परी चंद्रोदय होता येत । दया त्याची राजदूतांप्रत । ते त्यास खावया देत । तें भक्षिलें तेणें सत्वर ।।४५।। पंचमी उजाडतां झाला मृत । बंधनीं मार भीषण असत । परी न कळत घडून व्रत । गणेशसायुज्य पावला ।।४६।। अन्तीं स्वानंदपुरांत जाऊन । राहिला आनंदात । ऐसा हा असे वृत्तान्त । दुष्ट पापी दुरात्म्याचा ।।४७।। तोही उद्धरला जगांत । तरी जाणून जे जन व्रत करित । त्यांचें पुण्य अगणित । अनेक जन मुक्त जाहलें ।।४८।। त्या समस्तांचें वर्णन । करण्या अशक्य मान । ऐसे हें वैशाखी कृष्ण चतुर्थीचें महिमान । ऐकतां वाचितां परमपदप्राप्ती ।।४९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खण्डे गजाननचरिते वैशाख कृष्ण चतुर्थीचरितवर्णनं नाम त्रयोविंशोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तेवीसांवा संपूर्ण)